सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १६२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २२ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## बिहार मतदार यादीच्या वादावरून संसदेत विरोधकांचे आंदोलन

### लोकसभा-राज्यसभा काही वेळा साठी स्थगित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नवी दिल्ली**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी, मंगळवारी लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज सुरू होताच विरोधकांनी गोंधळ घातला. पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर यासारख्या मुद्द्यांवर सभागृहात चर्चा व्हावी अशी विरोधी पक्षाच्या खासदारांची मागणी आहे. पंतप्रधानांनी याचे उत्तर द्यावे. राज्यसभा दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आली.

त्याचवेळी, बिहार मतदार यादीच्या विशेष गहण सुधारणा (SIR) च्या मुद्द्यावर विरोधी पक्षाच्या खासदारांनी मकर




द्वारच्या बाहेर घोषणाबाजी केली. विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, सपा प्रमुख अखिलेश यादव यांच्यासह अनेक खासदारांनी निषेधात भाग घेतला.

दुसऱ्या दिवसाच्या कामकाजापूर्वी, संसद भवनात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांच्यात बैठक झाली. केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांच्यासह इतर मंत्र्यांनीही त्यात भाग घेतला. त्याचवेळी, I.N.D.I.A. आघाडीच्या नेत्यांनीही बैठक घेतली.

संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलै ते २१ ऑगस्ट पर्यंत म्हणजेच एकूण ३२ दिवस चालेल. या काळात १८ बैठका होतील आणि १५ हून अधिक विधेयके मांडली जातील. स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवामुळे १३-१४ ऑगस्ट रोजी संसदेचे कामकाज होणार नाही.

केंद्र सरकार पावसाळी अधिवेशनात ८ नवीन विधेयके मांडणार आहे, तर ७ प्रलंबित विधेयकांवर चर्चा होईल. यामध्ये मणिपूर जीएसटी दुरुस्ती विधेयक २०२५, आयकर विधेयक, राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक यासारख्या विधेयकांचा समावेश आहे.


पहिल्या दिवशी, नवीन आयकर विधेयकावर स्थापन केलेल्या संसदीय समितीचा अहवाल लोकसभेत सादर केला जाईल. समितीने २८५ सूचना दिल्या आहेत. ६२२ पानांचे हे विधेयक ६ दशके जुन्या आयकर कायदा १९६१ ची जागा घेईल.

## उपराष्ट्रपती पदासाठी हरिभाऊ बागडे यांचे नाव चर्चेत

### राजस्थानचे राज्यपाल होण्याआधी होते महाराष्ट्राच्या विधानसभेचे अध्यक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नवी दिल्ली**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आरोग्याच्या कारणामुळे अचानक राजीनामा दिला आहे. या घटनाक्रमामुळे देशभरात उपराष्ट्रपती पदाच्या निवडीसाठी चर्चांना उधाण आले आहे. त्याचवेळी महाराष्ट्रातील एक प्रमुख नेत्याचे नाव उपराष्ट्रपती म्हणून चर्चेत आहे, राजस्थानचे राज्यपाल आणि महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांचे.



उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आरोग्याच्या कारणावरून आपला राजीनामा दिला आहे. संसदेत पावसाळी अधिवेशन चालू असतानाच हा राजीनामा समोर आला, आणि यामुळे उपराष्ट्रपती पदावर पुढे कोण येणार याबाबत चर्चा सुरू झाली आहे. त्यांचा राजीनामा स्वीकारण्यात आल्याने आता नवीन उपराष्ट्रपती कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून यासाठी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा माध्यमांमध्ये सुरू झाली आहे.

**बागडेंच्या नावाची चर्चा**

उपराष्ट्रपती पदाच्या चर्चेत सध्या एक महाराष्ट्रातील नाव पुढे येत आहे, आणि ते म्हणजे हरिभाऊ बागडे. महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष आणि राजस्थानचे राज्यपाल असलेल्या हरिभाऊ बागडेंच्या नावाची उपराष्ट्रपती म्हणून निवड होऊ शकते, असे बोलले जात आहे. हरिभाऊ बागडे हे फुलंब्री विधानसभा मतदारसंघातून पाच वेळा आमदार राहिले आहेत. त्यांना लोक नाना म्हणून ओळखतात, आणि त्यांचा जीवनप्रवास एक प्रेरणादायी आहे. शेतकरी कुटुंबातून आलेले हरिभाऊ यांनी लहानपणी घराघरात जाऊन वृत्तपत्र विकले होते. शेतकरी कुटुंबात वाढलेल्या हरिभाऊंना शेती प्रती विशेष आकर्षण आहे, आणि त्यांचं नामकरण कृषी योग असे करण्यात आले आहे.

## जाहिरात स्कीप करण्यास ४२ सेकंद लागतात का?

### रोहित पवारांचा माणिकराव कोकाटेंना सवाल, आणखी दोन व्हिडिओ केले शेअर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२ मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे पत्ते खेळतानाचे आणखी दोन व्हिडिओ त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट कृषिमंत्र्यांच्या स्पष्टीकरणावर थेट आक्षेप घेतला आहे. सभागृहाचे कामकाज संपले होते, हे माणिकराव कोकाटेंचे वक्तव्य खोटे आहे. सभागृहात महत्त्वाच्या विषयावर चर्चा सुरू होती, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे. तसेच जाहिरात स्कीप करण्यासाठी ४२ सेकंद लागतात का? असा सवालही त्यांनी कृषिमंत्र्यांना केला आहे.

रोहित पवार यांनी दोन दिवसांपूर्वी माणिकराव कोकाटे यांचे विधिमंडळ सभागृहातील मोबाइलवर पत्ते खेळतानाचा व्हिडिओ शेअर केला होता. तेव्हापासून विरोधकांकडून माणिकराव कोकाटेंच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. यावर कोकाटे यांनी मी यूट्यूबवर व्हिडिओ पाहत होतो, त्यादरम्यान, रम्मीची जाहिरात आल्याने ती स्कीप करत होते, असे स्पष्टीकरण दिले. मात्र आता रोहित पवार यांनी जाहिरात स्कीप करण्यासाठी ४२ सेकंद लागतात का? असा सवाल कोकाटे यांना केला आहे.

राजीनामा द्यावाच लागेल! सभागृहाचे कामकाज संपले होते हे कृषिमंत्री महोदयांचे विधान धडधडीत खोटे आहे. उलट विकासाच्या मूळ प्रवाहापासून दूर असलेल्या आदिवासी बांधवांना दुधाळ जनावरं देण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा सुरु होती, पण 'ओसाड



गावच्या पाटलांना' या चर्चेत रस नसावा, अशी टीका रोहित पवार यांनी केली. मला सांगा पत्त्याची कोणती जाहिरात स्कीप करण्यासाठी ४२ सेकंद लागतात हो? असा सवालही रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे.

**कोकाटेंची गिरे तो भी टांग उपर अशी भूमिका**

विझताना दिव्याची ज्योत मोठी होते, तसेच काहीसे कोकाटे साहेबांचे झालंय.. आज राजीनामा देऊन शेतकऱ्यांवर ते उपकार करतील, असे वाटत होते पण 'गिरे तो भी टांग उपर' अशी त्यांनी भूमिका घेत कोर्टात जाण्याची भाषा केली, हे दुर्दैव असल्याचे रोहित पवार म्हणाले. मंत्री महोदय स्वतःला वाचवण्यासाठी आज जेवढा खटाटोप करत आहेत त्यापेक्षा दिलेल्या पदाला न्याय देण्यासाठी केला असता तर ही वेळ आली नसती, असा टोलाही रोहित पवारांनी लगावला.

## मला जंगली रमी येत नाही, त्यासाठी मोबाईल नंबर, बँक अकाऊंट जोडावं लागतं

### दोषी असेल तर राजीनामा देतो : माणिकराव कोकाटे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधिमंडळात मोबाईलमध्ये रमी गेम खेळतानाचा व्हिडिओ राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी ट्विट केल्याने कोकाटे चांगलेच अडचणीत आले आहे. ऑनलाइन पत्ते खेळणाऱ्या माणिकराव कोकाटे यांचा पत्ता कट होणार का? असा सवाल सर्व स्तरातून विचारला जात आहे. विरोधकांकडून माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी माणिकराव कोकाटे यांच्यावर कारवाईचे संकेत दिले होते. शेतकरी संकटात असताना कृषी मंत्र्यांचे वागणं अयोग्य असल्याचे त्यांनी म्हटले आहे. आता अजित पवार माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेणार की त्यांची खुर्ची शाबूत राहणार? याकडे सर्वांचे



लक्ष लागले होते. आता माणिकराव कोकाटे यांनी नाशिक येथे पत्रकार परिषदेत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

माणिकराव कोकाटे म्हणाले की, हा छोटा विषय आहे. हा विषय एवढा लांबला का? हे कळत नाही. ऑनलाइन रमी तुम्हाला माहिती आहे का? त्याला बँकेचे खाते जोडावे लागते. माझा असा कोणताही मोबाईल नंबर आणि बँक अकाऊंट ऑनलाईन रमीच्या ॲप्लिकेशनला जोडलेला नाही. कुठेही चौकशी करा. ज्या दिवसापासून ऑनलाईन रमी सुरु झाली आहे, तेव्हापासून मी एक रुपयाची रमी खेळलेली नाही. किंबहुना मला रमी खेळताच येत नाही. त्यामुळे माझ्यावरील आरोप बिनबुडाचा आहे. यामुळे माझी महाराष्ट्रात बदनामी झाली आहे. कारण असताना ऑनलाईन रमीचा जो आरोप केला आहे, ज्या राजकीय नेत्यांनी आरोप केला आहे, ज्यांना माझी बदनामी केली आहे, त्यांना कोर्टात खेचल्याशिवाय मी राहणार नाही, असा इशारा त्यांनी यावेळी विरोधकांना दिलाय.

**माझ्यावरील आरोपांमध्ये काहीही तथ्य नाही**

माणिकराव कोकाटे पुढे म्हणाले की, मी त्यादिवशी सभागृहात होतो, माझं काम होतं. मला माझ्या ओएसडीकडून माहिती हवी असेल तर मला एसएमएस किंवा फोन करावा लागतो. त्यांना सभागृहात आत येत नाही. त्यासाठी मी एक मोबाईल मागवला होता. मोबाईल उघडल्यावर त्याच्यावर तो गेम आला, त्या गेमचा सारखा पॉप-अप येतो. तो मला स्कीप करता आला नाही. तो मोबाईल माझ्यासाठी नवीन होता म्हणून मला गेम स्कीप करायला वेळ लागला. पण मी गेम स्कीप केल्याचा व्हिडिओ तुमच्यापर्यंत आलाच नाही, तो तुम्ही दाखवलाच नाही. मोबाईलवर एकच गेम येत नाही, वेगवेगळे गेम येतात. ३० सेकंद गेम स्कीप करता येत नाही. माझा व्हिडिओ ११ सेकंदांचा आहे. त्यावरुन आरोप-प्रत्यारोप सुरु झाले. पूर्ण व्हिडीओ दाखवला असता तर माझ्यावरील आरोपांमध्ये काहीही तथ्य नाही, हे स्पष्ट झाले असते, असे त्यांनी देखील यावेळी म्हटले.

**दोषी असेल तर राजीनामा देतो**

मी आता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सभापती आणि विधानसभा अध्यक्षांना लेखी पत्र देणार आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी होण्याची गरज आहे. त्यामुळे माझ्या पत्राच्या आधारे तुम्ही चौकशी करावी. मी ऑनलाईन रमी खेळत असेन, मी दोषी सापडलो तर नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांपैकी कोणीही निवेदन करावं, त्या क्षणाला न थांबता मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्याला न भेटता मी राज्यपालांकडे जाऊन माझा राजीनामा देईन, असे माणिकराव कोकाटे यांनी म्हटले आहे.

## मुंबई साखळी बॉम्बस्फोटातील आरोपींच्या निर्दोष सुटके विरोधात महाराष्ट्र सरकार सर्वोच्च न्यायालयात; २४ जुलैला सुनावणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**

मुंबईत ११ जुलै २००६ रोजी झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपींना मुंबई उच्च न्यायालयाने आज निर्दोष ठरवत मोठा निर्णय दिला आहे. मात्र आता या निर्णयाला महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले आहे. त्यावर २४ जुलैला सुनावणी पार पडणार आहे.महाराष्ट्राच्या दहशतवाद विरोधी पथकाने मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान दिले आहे. त्यावर २४ जुलैला सुनावणी पार पडणार आहे. सर न्यायाधीस बी आर गवई यांच्या खंडपीठा पुढे ही सुनावणी पार पडणार आहे. दरम्यान उच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर देशभरातून संताप व्यक्त केला जात आहे.

## 'मला दोष मुक्त करा', वाल्मिक कराडचा अर्ज न्यायालयाने फेटाळला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२बीड**

बीडमधील गाजलेल्या संतोष देशमुख हत्या प्रकरणावर आज २२ जुलै २०२५ रोजी सुनावणी पार पडली. यामध्ये आरोपी वाल्मिक कराडचा अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. तसेच या प्रकरणाची पुढील सुनावणी ही ४ ऑगस्ट रोजी होणार आहे. याबाबत विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी दिली आहे.

वाल्मिक कराडने संतोष देशमुखच्या खटल्यातून मला दोष मुक्त करावं. याबाबत अर्ज दिला होता. तो अर्ज आज न्यायालयाने फेटाळला आहे. त्याचबरोबर दुसरा आरोपी विष्णू चाटे आणि इतर सर्व आरोपींनी आम्हाला या खटल्यातून वगळावे दोष मुक्त करावे अशा प्रकारे अर्ज केला होता. त्यावर जोरदार हरकत




घेतली गेली. न्यायालयाला सांगितले ही आरोपींची मोडस ऑपरेंटी आहे. आरोपींनी एकदा दोष मुक्तीचा अर्ज केला. तर अशा रीतीने वेळचा अपव्यय करायचा खटला लांबवायचा हा त्यांचा प्रयत्न आहे.

न्यायालयाला विनंती केली. सर्व आरोपींना दोष मुक्तीचा अर्ज करायचा असेल तसा करावा. आज विष्णू चाटेपासून उर्वरित सर्व आरोपींनी देखील दोष मुक्तीचा अर्ज केला आहे. या सर्व अर्जला खुलासा दिला आहे. तसेच वाल्मिक कराडने जामिनावर मुक्तता करावी असा देखील अर्ज केला. त्यावर देखील आम्ही आमचे म्हणणे मांडून विरोध केला आहे. आज न्यायालयात ड्राफ्ट चार्ज करून वाल्मिक कराड आणि त्याचे साथीदारा विरोधात वेगवेगळ्या कलमाखाली १२ ते १३ आरोप निश्चित केले जावे असा विनंती अर्ज केला आहे. या अर्जाची सुनावणी पुढे होणार आहे.

## शासन भिकारी आहे, कृषीमंत्री कोकाटेंच्या वक्तव्यामुळे नवा वाद?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मुंबई**

शेतकऱ्यांच्या पिकविम्याबाबत बोलताना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी काही महिन्यांपूर्वी एक वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. त्यावर स्पष्टीकरण करताना कोकाटे यांनी आज आणखी एक वक्तव्य केलं आहे, ज्यामुळे राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारची गोची झाली आहे. कोकाटे म्हणाले, शेतकऱ्यांकडून शासन एक रुपया घेतं. सरकार शेतकऱ्यांना एक रुपया देत नाही. म्हणजे भिकारी कोण आहे? शासन भिकारी आहे, शेतकरी नाही.

दरम्यान, कोकाटे यांच्या या वक्तव्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले, मी काही त्यांचं वक्तव्य ऐकलेलं नाही. परंतु, त्यांनी असं वक्तव्य केलं असेल तर ते चुकीचं आहे. कुठल्याही मंत्र्याने असं वक्तव्य करणं चुकीचं आहे. पिकविम्याबाबत अतिशय चुकीची माहिती पसरली गेली आहे.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, पिकविम्याबाबत आपण काही चांगले निर्णय घेतले आहेत. पिकविम्याची आधीची जी पद्धत होती त्यात शेतकऱ्यांना फायदा होत होता. मात्र, त्याहून अधिक फायदा विमा कंपन्यांचा होत होता. त्यामुळे आम्ही त्या पद्धतीत बदल केले. यासह आम्ही आणखी एक मोठा निर्णय घेतला. राज्याच्या कृषी क्षेत्रात दर वर्षी ५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला. पाच वर्षांत आपलं सरकार राज्याच्या कृषी क्षेत्रात २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. यामुळे कृषी क्षेत्राला मोठा फायदा होईल.

एखाद्या मंत्र्याने असं वक्तव्य करणं योग्य नाही. मी आजही सांगतो की देशातील इतर राज्यांच्या तुलनेत आपली अर्थव्यवस्था चांगली आहे. मी असं म्हणत नाही की आपली अर्थव्यवस्था सर्वात चांगली आहे किंवा आपण श्रीमंत आहोत, आपल्याकडे खूप पैसा आहे असं मी म्हणणार नाही. मात्र, देशातील जी विकसनशील राज्ये आहेत त्यांच्या तुलनेत आपली स्थिती नक्कीच चांगली आहे. मान्य आहे की आपल्यापुढे खूप आव्हानं आहेत. मात्र, आपल्या राज्याची वित्तीय तूट ही आम्ही सातत्याने तीन टक्क्यांहून कमी ठेवली आहे. मात्र देशातील अनेक राज्यांची वित्तीय तूट चार किंवा पाच टक्क्यांच्या आसपास आहे. तसेच कर्जाच्या बाबतीत अनेक राज्ये २५ टक्क्यांच्या पुढे आहेत. महाराष्ट्राची तशी अवस्था नाही.

संपादकीय ......

# मराठी शाळांची घटती संख्या

एका बाजूला मराठी - हिंदीचा वाद चव्हाट्यावर आला आहे. यावर सत्ताधारी - विरोधक आमने-सामने ठाकले आहेत. मात्र दुसर्या बाजूला मराठी शाळांची घटती संख्या याकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले आहे. शासनाचे शिक्षणासारख्या महत्त्वाच्या विषयांकडे होत असलेले दुर्लक्ष, यामुळे जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगरपालिका या शाळांमधील संख्या मोठ्या प्रमाणावर घटली आहे. मुंबईसह कोकणात हा आकडा तीन लाखांनी खाली आला आहे.

भारत हा तरुणांचा देश आहे, असे आपण म्हणतो. पण तरुण पिढीला घडविण्यासाठी धोरणे तयार करण्यात आणि ती राबविण्यात कमी पडतो, असे चित्र सर्वत्र पाहायला मिळत आहे. कोकणात हा प्रश्न अधिक गंभीरपणे पुढे आला, याचे मुख्य कारण एकशिक्षकी मराठी शाळांची संख्या, कोकणातील आदिवासी पाडे, धनगरपाडे अधिक आहेत. कोकणातील ७ जिल्ह्यांमध्ये जवळपास ९०० पेक्षा जास्त शाळा या एकशिक्षकी झाल्या आहेत. 'एक शिक्षक - चार वर्ग' या शिक्षण धोरणाचा अर्थ काढणेच कठीण झाले आहे. परिणामी शासनाच्या शाळांवर पालकांचा विश्वास कमी होऊ लागला आहे. एका बाजूला प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून झाले पाहिजे, यामुळे मुलांची आकलनशक्तही वाढते, हा विचार राज्यकर्ते सांगत आहेत; तर दुसर्या बाजूला अ आ ई... गिरवणार्या मराठी शाळांमध्ये शिक्षकच दिले जात नाहीत.

शिक्षण विभागातील धरसोड धोरण प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या मुळावर येऊ लागले आहे. एका बाजूला कमी म्हणजेच १० पटसंख्या असलेल्या शाळा नजीकच्या काळात समायोजित करून जादा शिक्षक देण्याचे धोरण आखले गेले आणि शिक्षकांचे आंदोलन झाल्यानंतर ते मागेही घेतले गेले. परिणामी चार वर्ष आणि एक शिक्षक हे अनाकलनीय धोरण पुन्हा कायम राहिले. याचा परिणाम शासनाच्या शाळांकडे पालकांचा बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यात झाले. पालक ज्या इंग्रजी शाळेकडे मुलं पाठवतात, तिथे तर अप्रशिक्षित शिक्षक अधिक आहेत. मात्र शासनाच्या मराठी शाळांमध्ये शिक्षकच नसल्याने अप्रशिक्षित शिक्षक चालतील, असा निर्णय घेऊन पालकांचा ओढा खासगी इंग्रजी माध्यमांकडे वाढला. यातूनच अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या झपाट्याने कमी झाली. सिंधुदुर्गच्या शिक्षणाधिकार्यांनी जगावेगळा निर्णय घेत माध्यमिक शाळांना शिक्षकच दिले नाहीत. यामुळे इंग्रजी, विज्ञानसारख्या विषयांना अनुदानित शाळांना शिक्षकच नाहीत.

त्यामुळे या शाळांची पटसंख्या मोठ्या प्रमाणात घसरली आणि या शाळा बंद होण्याच्या उंबरठ्यावर आहेत. असे अनाकलनीय निर्णय घेणार्या शिक्षण व्यवस्थेला आता समाजानेच जाब विचारला पाहिजे. सध्या शिक्षण व्यवस्था ही अशक्त आणि अविचारांच्या गर्तेत आहे. कुठलेच धोरण निश्चित ठरवले जात नाही आणि त्याची अंमलबजावणीही होत नाही. यात नव्या शैक्षणिक धोरणाच्या नव्या अंमलबजावणीचे शिवधनुष्य पेलायचे आहे. आता नवी शिक्षण व्यवस्था पुन्हा गुरुकुल व्यवस्थेकडे जाणार आहे. पण हे सर्व होण्यास योग्य धोरण आणि योग्य अंमलबजावणी याची खरी गरज आहे.

एका बाजूला आंतरराष्ट्रीय शिक्षणाच्या दर्जाशी तुलना करत नवे शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे. या धोरणामध्ये पुरातन गुरुकुल संस्कृतीचा पुन्हा अवलंब केला जाणार असून या धोरणाची अंमलबजावणी तीन टप्प्यांत होणार आहे. मूलभूत शैक्षणिक सुविधांमध्ये नैसर्गिक मूल्यांवर आधारित शैक्षणिक वातावरणनिर्मिती याचा समन्वय या नव्या आराखडा तयार करून शिक्षण व्यवस्थेचे धृवीकरण करण्यात आले आहे. मात्र हे करत असताना शिक्षक पदनिर्मितीचा कुठेही उल्लेख दिसत नाही. बोर्ड परीक्षा व्यवस्था ठरवताना पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण असे टप्पे तयार करताना उच्च माध्यमिक स्तरावर असलेली बारावी बोर्ड परीक्षा आता उच्च शिक्षण स्तरावर देण्यात आली. खरं तर टप्प्यानुसार परीक्षांचे धोरण यात घेणे आवश्यक आहे. याचा विसर पडल्याचे दिसते.

# मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष

## जनतेच्या आरोग्यासाठी समर्पित योजना

## गरजूंना दिलासा देणारे कार्य

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पना आणि मार्गदर्शनातून तसेच मंत्रालयातील मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या सक्रिय सहभागातून सुरु झालेला आहे.




ही जनतेच्या आरोग्यासाठी समर्पित योजना असून यामार्फत गरजूंना दिलासा देणारे कार्य शीघ्रतेने सुरु आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचार करण्यासाठी या योजनेतून अर्थसहाय्य पुरविले जाते. राज्यातील तसेच देशातील आपत्तीग्रस्तांना तातडीने सहाय्य देणे, हे मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे उदिष्ट आहे. पूर, दुष्काळ, आगीमुळे होणारे अपघात अशा मोठया नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित नागरिकांना मुख्यमंत्री सहायता निधी मार्फत अर्थसहाय्य पुरविले जाते.अमरावती जिल्हयातील मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे औपचारिक उद्घाटन १ मे २०२५ रोजी करण्यात आले असून जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कक्ष कार्यरत आहे. १ जानेवारी ते ३० जून २०२५ या कालावधीतील या कक्षामार्फत यशस्वीरित्या कार्य चालू आहे. यात एकूण लाभार्थी रुग्ण १७३ असून यांच्या उपचारासाठी एकूण १ कोटी ६९ लक्ष १५ हजार रुपये निधीचे वितरण करण्यात आले. या कालावधीत विविध गंभीर आजारांवर उपचारासाठी गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत आर्थिक मदत करण्यात आली. मुख्यमंत्री सहायता निधी कक्षा अंतर्गत जिल्ह्यातील ६६ नोंदणीकृत रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष योजनेतंर्गत कोक्लेअर इम्प्लांट, हार्ट, लिव्हर, किडनी, लंग, बोन मॅरो ट्रान्सप्लांट, हॅंड री-कन्स्ट्रक्शन, हिप,नी रिप्लेसमेंट, कॅन्सर सर्जरी, केमोथेरपी, रेडिओथेरपी, नवजात अर्भकांचे विकार, अपघात व विद्युत जळीत, डायलिसिस, हृदयरोग, लिगामेंट सर्जरी, बालकांच्या शस्त्रक्रिया इत्यादी आजारांचा समावेश आहे. यासाठी विहित नमुन्यातील अर्ज, रुग्ण दाखल असल्याचा जिओ-टॅग फोटो, वैद्यकीय खर्चाचे प्रमाणित अंदाजपत्रक, उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न १ लाख ६० हजारापेक्षा कमी असणे आवश्यक) आधार व रेशन कार्ड, संबंधित निदान, उपचाराची कागदपत्रे, अपघात असल्यास एफआयआर, अवयव प्रत्यारोपण रुग्णांसाठी अधिकृत प्रमाणपत्र ही कागदपत्रे आवश्यक आहेत. ई-मेलद्वारे अर्ज सादर करण्यासाठी रे.लीष-ीहर्सीं.ळप या मेल आयडीवर मेल करावे. अथवा रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक वरील ईमेलवर सर्व कागदपत्रांसह पीडीएफ स्वरूपात अर्ज सादर करू शकतात. आवश्यकतेनुसार संबंधितांनी कक्षाशी थेट संपर्क साधावा.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष योजनेत पुढील बाबींचा समावेश नाही. जसे राज्याबाहेरील रुग्णालयातील उपचार, योजनेच्या व्याप्तीतील नसलेले आजार, आधीच डिस्चार्ज झालेल्या किंवा उपचार पूर्ण झालेल्या रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत अर्थसहाय्य नाही. पूर्वी गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीसाठी मंत्रालय, मुंबई येथे जावे लागत होते. आता मात्र जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथेच मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष स्थापन झाल्याने, सर्व आवश्यक प्रक्रिया, मार्गदर्शन व मदत स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध झाली आहे. यामुळे वेळ, पैसा आणि श्रम वाचून गरजूंना त्वरित मदत मिळविणे शक्य झाले असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे अध्यक्ष डॉ. श्याम सुरेश गावंडे यांनी सांगितले.

**अपर्णा यावलकर**
माहिती अधिकारी,अमरावती






## अनवाणी हिरव्यागार गवतावर चालण्याचे असतात अनेक फायदे, मन होईल शांत आणि पाय राहतील मजबूत

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

काही अगदी साध्या कृती असतात ज्या आपल्या आरोग्यासाठी फार फायद्याच्या ठरतात. शरीराला फायदा देणार्या काही सवयींपैकी एक म्हणजे गवतावर अनवाणी चालणे. शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी असे चालणे फार चांगले ठरते.



हिरव्यागार गवतावर चालण्याचा फायदा होतो. कोणत्याही गवतावर चालू नका. फक्त कोवळ्या छान हिरवळीवर चालायचे. अनवाणी गवतावर चालण्याला 'ग्राउंडिंग' किंवा 'अर्थिंग' असेही म्हणतात.

अनवाणी चालल्याने पायातील स्नायू आणि सांधे जास्त कार्यशील होतात. त्यामुळे त्यांची ताकद आणि लवचिकता वाढते. चालण्यातही नैसर्गिक पद्धतीत सुधारणा होते आणि पायाचे विविध रोग टाळता येतात.अनवाणी चालल्याने पायातील स्नायू आणि सांधे जास्त कार्यशील होतात. त्यामुळे त्यांची ताकद आणि लवचिकता वाढते. चालण्यातही नैसर्गिक पद्धतीत सुधारणा होते आणि पायाचे विविध रोग टाळता येतात.

पायाच्या तळव्यांमधील संवेदनशील नसा जास्त कार्यशील होतात. त्यामुळे शरीराचे संतुलन चांगले राहते आणि पायांची स्थिती सुधारते.

गवतावर चालणे पाण्यातून चालणे अशा कृतींमुळे मानसिक आरोग्य छान राहण्यास मदत होते. गवतावर चालल्याने मनःशांती मिळते तसेच ताण कमी होतो. मेंदूतील सेरोटोनिनची पातळी वाढते, ज्यामुळे विचारांमध्ये सुधारणा होते.

छान ताज्या गवतावर अनवाणी पायांनी फेऱ्या मारायच्या. असे केल्याने झोप फार छान लागते. गवतावर चालल्यावर शरीरातील सर्केडियन संतुलित होतो त्यामुळे झोप सुधारते

अनवाणी चालल्याने पायांचे स्नायू मजबूत होतात. त्यामुळे संतुलन सुधारते आणि पायांच्या नैसर्गिक हालचालींना चालना मिळते. पायांच्या हालचाली जास्त चांगल्या होतात.

गवतावर चालल्यावर पायाच्या बोटांवर दाब येतो. दाब आल्याने डोळ्यांचे मज्जातंतू सक्रिय होतात. ज्यामुळे दृष्टी सुधारण्यास मदत होते.

# फवारणी करताना छोटी चूक, मोठं नुकसान करेल; वाचा सुरक्षिततेचे उपाय

विदर्भ प्रजासत्ताक
कृषी विशेष

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक**

खरीप हंगामात तण व किडींच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्यांकडून कीटकनाशक आणि तणनाशक फवारणी मोठ्या प्रमाणात केली जाते.मात्र, योग्य काळजी न घेतल्यास विषबाधेचा धोका वाढतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी फवारणी करताना सुरक्षेची योग्य खबरदारी घेणं अत्यंत गरजेचं आहे. कृषी विभागाने यासाठी काही महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.

खरीप हंगामात पिके जोमाने वाढत असल्याने त्यावर तणनाशक व कीटकनाशक फवारणी करण्याचे प्रमाण वाढले आहे.पावसामुळे तणांचा वाढलेला प्रादुर्भाव आणि ढगाळ वातावरणामुळे वाढलेल्या किडींचा सामना करण्यासाठी फवारणीला गती आली आहे. मात्र, फवारणीच्या वेळी योग्य ती काळजी न घेतल्यास विषबाधा होण्याचा धोका वाढतो.

अलीकडेच कारंजा तालुक्यात अशाच प्रकारची दुर्घटना घडल्याने कृषी विभागाने सतर्कतेचे आवाहन केले आहे. जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी आरिफ शाह यांनी सांगितले की, फवारणी करताना योग्य तंत्रज्ञान, योग्य साहित्य व वैयक्तिक सुरक्षेची काळजी घेणे अत्यावश्यक आहे.

**फवारणी करताना घ्यावयाची काळजी**

* कीटकनाशकांचे मिश्रण नेहमी लाकडी काडीने नीट मिसळा.

* हातमोजे, रबरी बूट, मास्क व चष्मा वापरा.

* औषध अंगावर उडाल्यास लगेच साबण व पाण्याने धुवा.

फवारणी दरम्यान नळी किंवा नॉझल अडकली तर ती तार किंवा टाचणीने स्वच्छ करा.

* फवारणीनंतर लगेच आंघोळ करा व कपडे धुवा.

* वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने फवारणी करू नका.

* डबे व बाटल्या स्वच्छ करून पिण्यासाठी पाण्यासाठी वापरू नका.

फवारणी करताना काय करू नये?

* उपाशीपोटी फवारणी करू नका.

* फवारणी करताना धूम्रपान करू नका व अन्नपदार्थ खाऊ नका.

* वाऱ्याच्या विरुद्ध फवारणी टाळा.

* औषधाचे उरलेले मिश्रण अथवा रिकामे डबे उघड्यावर टाकू नका.

**विषबाधा झाल्यास काय कराल?**

* तातडीने जवळच्या शासकीय दवाखान्यात जा.

* १०८ या टोल फ्री क्रमांकावर म्ब्युलन्स मागवा.

* रुग्णाला शक्य तितक्या लवकर डॉक्टरांकडे पोहोचवा.

* रुग्णाच्या अंगावरील औषधाचे डाग, ओले कपडे तातडीने बदलून स्वच्छ पाण्याने धुवा.

डब्यावरील रंगी पट्ट्यांचा अर्थ ओळखा

किटकनाशक व तणनाशकांच्या डब्यांवर रंगीत पट्ट्या असतात.

त्या औषधाची तीव्रता दाखवतात

* लाल पट्टी - अत्यंत विषारी

पिवळी पट्टी - मध्यम तीव्रता

निळी पट्टी - कमी तीव्रता

* हिरवी पट्टी - सौम्य




**महत्वाच्या बाबी**

सततच्या पावसानंतर तण व किडींचा प्रादुर्भाव.

फवारणी करताना सुरक्षेची पूर्ण खबरदारी आवश्यक.अपघात टाळण्यासाठी योग्य तंत्र आणि वैयक्तिक सुरक्षा साहित्य वापरा.विषबाधा झाल्यास तातडीने वैद्यकीय मदत घ्या.

**कृषी विभागाचा सल्ला**

खरीप हंगामात फवारणी टाळता येत नाही. मात्र, स्वतःच्या आणि पिकांच्या सुरक्षेसाठी योग्य दक्षता घ्या. फवारणी करताना सुरक्षेच्या साधनांचा वापर करा आणि शास्त्रीय मार्गदर्शनानुसारच औषध वापरा. -

**आरिफ शाह,** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वाशिम

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बॅंकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# साफसफाई कर्मचाऱ्यांसाठी कार्यक्षमता वृद्धी प्रशिक्षण कार्यशाळा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती-** स्वच्छ भारत मिशन (शहरी) अंतर्गत अमरावती महानगरपालिका व स्वच्छता ज्ञान भागीदार फीडबॅक फाउंडेशन चारिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने कचरा संकलन व वाहतूक विभागातील कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसीय कार्यक्षमता वृद्धी प्रशिक्षण कार्यशाळा बडनेरा : मार्गावरील हॉटेल विरसा येथे पार पडली. ही कार्यशाळा मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्यामार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेची सुरुवात सहभागी कर्मचाऱ्यांच्या नोंदणी व प्रशिक्षण साहित्य वितरणाने झाली.

सहभागी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण किटमध्ये बॅग, नोटपॅड, लेखन साहित्य व स्टीलची पाण्याची बाटली प्रदान करण्यात आली. मनपा झोन क्र. १ रामपुरी कॅम्प अंतर्गत कार्यरत ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक, स्वास्थ निरीक्षक, कंत्राटदार, स्वच्छता सेवक, मदतनीस, वाहनचालक व पर्यवेक्षक अशा ६० हून अधिक कर्मचाऱ्यांनी या कार्यशाळेत सहभागघेतला.

प्रारंभिक सत्रात अमरावती शहराच्या स्वच्छ भारत अभियानाच्या शहर समन्वयक श्वेता बोके यांनी कार्यशाळेचे उद्दिष्ट स्पष्ट केले. यानंतर फीडबॅक फाउंडेशनचे विषयतज्ज्ञ ज्योती प्रकाश यांनी घनकचरा मूल्यसाखळीवर व्यवस्थापन आधारित संसाधन पुनर्प्राप्ती व कार्यक्षमता वृद्धी या विषयावर सविस्तर सत्र घेतले. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी झोन क्रं. १ चे ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक आर. के. ढिक्याव यांनी मार्गदर्शन केले.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

मंगळवार दि. २२ जुलै २०२५

शहर/ग्रामिण


## मुंबई लोकल साखळी बॉम्ब स्फोट प्रकरण ...


# अमरावती कारागृहात बंदिस्त चार आरोपींची सुटका, नातेवाईकांसह रात्रीच मुंबईला रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

मुंबईतील लोकलमध्ये झालेल्या साखळी बॉम्ब स्फोटातील संशयीत आरोपी तनवीर अहमद मोहम्मद इब्राहीम अन्सारी, मोहम्मद माजीद मोहम्मद शफी, सोहेल मोहम्मद शेख आणि जमीर अहमद लतीफुर रहेमान शेख हे चार जण ३० सप्टेंबर २०१५ पासून अमरावती मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत होते. २०१९ मध्ये त्यांनी अपील अर्ज दाखल केला होता. तेव्हापासून त्याचे वकील ॲड. तंबोली, ॲड. युग युग चौधरी, ॲड. वहाब खान, ॲड शाहिद नदीम आणि अमरातीच्या ॲड. सिमी शेख यांनी सतत पाठपुरावा









केला. यादरम्यान ॲड. सिमी शेख यांनी २०१९ ते २०२१ पर्यंत संशयीत आरोपींची वेळोवेळी मुलाखत घेत होत्या. दरम्यान सोमवारी न्यायालयाने त्यांची निर्दोष सुटका केली. त्यानंतर चारही जण रात्रीच आपल्या नातेवाईकांसमवेत मुंबईला रवाना झाले.आज आम्ही २० वर्षानंतर सुटलो आहे. आमचा देवावर आणि न्यायालयावर खूप विश्वास आहे. आमचा कुठलाही दोष नव्हता आम्ही सत्र न्यायालयातून सुटणार होते परंतु आम्ही येथून सुटलो. त्यामुळे न्यायाधीश व आमच्या वकिलांचे आभार मानतो. माझ्यावर सीमीसोबत संबंध असल्याचा आरोप होता. परंतू तसे काही नव्हते ती खूप जुनी घटना आहे. सरकारकडे आमची कुठलीच मागणी नाही, असे निर्दोष सुटलेल्या सोहेल मोहम्मद शेख यांनी सांगितले.बॉम्ब स्फोट प्रकरणातून निर्दोष सुटका झाल्याची माहित पडताच चारही संशयीत आरोपींचे नातेवाईक अमरावतीला आले होते. सायंकाळी ७.४० वाजता चारही जण कारागृहातून बाहेर येताच त्यांनी त्याच्या वकिल ॲड सिमी शेख यांची भेट घेतली व लगेचच मुबंई कडे रवाना झालेत.

# प्रकाश साबळे यांच्या नेतृत्वात कृषी अधिकाऱ्यांच्या दालनात शेतकऱ्यांनी खेळली रमी

## कृषी मंत्री कोकाटे विरोधात घोषणाबाजी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती –** सोयाबीनवर हुमणी अळीचा प्रकोप वाढलेला असताना रमी मास्टर कृषी विभागाचे अधिकारी केवळ दालनात बसून शेतकऱ्यांचे नुकसान पाहत आहेत, असे सांगत शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकाऱ्याच्या दालनात त्यांच्याच टेबलवर रमी जुगाराचा खेळ खेळण्याचे आंदोलन केले.

भातकु ली तालुक्यातील परिसरातील सोयाबीनवर हुमणी अळीचा प्रकोप झाल्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी हातबल झालेला आहे. गेल्या एक ते दीड महिन्यापासून पेरलेल्या सोयाबीनच्या शेतामध्ये हुमणी अळीमुळे प्रचंड नुकसानझालेले आहे. तरीही कृषी विभागाला जाग आलेली नाही. भातकुलीउपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय अंतर्गतकृषी विभागाचा कोणताच अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांच्या बांधावर गेला नाही, त्याला मार्गदर्शन केले नाही, हुमणी अळी म्हणजे काय? हे सुद्धा सांगितले नाही, तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आजादी दूंगा अशा परिस्थितीमध्ये रमीमास्टर कृषिमंत्र्याच्या कृषी विभागाकडून शेतकऱ्यांनी काय अपेक्षा करावी ? असा हा प्रश्न सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे नेते प्रकाश साबळे यांनी प्रशासनाला केला आहे.

याप्रसंगी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने प्रकाश साबळे, शेखर अवघड, अमित कुचे, धीरज तायडे, बाबाराव महात्मे, चेतन वानखडे, अमर इंगळे, सुबोध खेतकडे, विजय जपुलकर यांनी शेतकऱ्यांच्या वतीने उपविभागीय कृषी अधिकारी पंकज चेडे, कृषी अधिकारी सागर इंगोले व उपस्थित कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक यांना शेतकऱ्यांच्या भावनांचा उद्रेक विशद केला. याप्रसंगी इशारासुद्धा दिला की, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या शेताचे त्वरीत सर्वेक्षण करून त्यांच्या नुक़सानीचे पंचनामे करून प्रशासनाला सादर करावे, अन्यथा शेतकऱ्यांच्या भावनांचा उद्रेक होईल.

# हनुमान आखाड्याची यशोगाथा शुक्रवारी सह्याद्रीवर

## ‘पद्मश्री’ प्रभाकरराव वैद्य यांच्याशी नितीन भट साधणार संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती :**

५आशिया खंडातील सर्वात मोठी क्रीडा संस्था असा लौकिक असलेल्या अमरावतीच्या श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाची यशोगाथा येत्या शुक्रवारी २५ जुलै रोजी दुपारी १२ वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून दाखवली जाणार आहे. मंडळाचे सर्वेसर्वा ’पद्मश्री’ प्रभाकरराव वैद्य यांच्याशी अमरावतीचे प्रख्यात निवेदक नितीन भट यांनी संवाद साधला आहे. या कार्यक्रमातून हनुमान आखाड्याच्या एकशे अकरा वर्षांच्या इतिहासाला उजाळा मिळणार आहे.स्व. अंबादासपंत वैद्य यांनी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाची केलेली स्थापना, प्रभाकरराव वैद्य यांचा क्रीडाक्षेत्रात प्रवेश, मंडळाची होत गेलेली प्रगती आणि वाढत गेलेला व्याप, विविध क्रीडा प्रकाराचे अभ्यासक्रम, १९३६ साली बर्लिन इथे झालेल्या ऑलम्पिकमध्ये मंडळाच्या खेळाडूंनी मिळवलेले यश,



स्वातंत्र्यलढ्यात व्यायाम प्रसारक मंडळाचे योगदान, स्वातंत्र्य सेनानी भगतसिंग, राजगुरू यांच्यासह महात्मा गांधी आणि डॉ. राजेंद्रप्रसाद यांचा मंडळाच्या भूमीला झालेला पदस्पर्श, देशाच्या कानाकोपऱ्यातून शिक्षण घ्यायला येणारे आणि सध्या मोठमोठ्या हुद्यावर कार्यरत असलेल्या विद्यार्थ्यांची कामगिरी, जलतरण तलावाच्या निर्मितीचा इतिहास, आश्रयशाळा, आयुर्वेद आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाची उभारणी, स्टुडंट एक्सचेंज आणि कल्चरल एक्सचेंज प्रोग्राम, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांसाठी जनजागृती अभियान, चाईल्ड हेल्पलाईनचे कार्य, मंडळाची कडक शिस्त, प्रभाकरराव वैद्य यांचा दरारा, त्यांचा आगे बढो; सबसे आगे बढोचा नारा, साहित्य, संगीत आणि नाट्य विधेच्या सादरीकरणासाठी मंडळाने सातत्याने दिलेले प्रोत्साहन आणि भरीव योगदान, स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृहाच्या निर्मितीमागील हळवा संदर्भ, कविवर्य सुरेश भट आणि प्रभाकरराव वैद्य यांची जगावेगळी मैत्री, असे अनेक पदर या मुलाखतीतून उलगडले जाणार आहेत. नागपूर दूरदर्शनने या कार्यक्रमाची निर्मिती केलेली असून कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन कार्यक्रमाचे निर्माता मनोज जैन आणि निर्मिती सहाय्यक मिलिंद नेटके यांनी केले आहे.

# ‘सफेद चावल’ कोडवर्डने एमडी ड्रग्जची शहरात विक्री

## दोन्ही डिलिव्हरी बॉयला २३ जुलैपर्यंत कोठडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती–**

’सफेद चावल’ हा कोडवर्डने वापरून शहरात एम.डी. ड्रग्स ड्रग्ज बोलावितात आणि हस्तकाच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत ती त्याच कोडवर्डने पोहचवितात. सर्वसामान्य व्यक्तींसमोरसुध्दा ते मोबाईलवर ’सफेद चावल’ आया, कितना होना, कहां भेजू, असे म्हणून ते शहरातील ग्राहकांपर्यंत एमडी ड्रग्ज पुरवितात, अशी धक्कादायक माहिती पोलीस तपासात पुढे आलेली आहे. दरम्यान या प्रकरणात पकडलेल्या दोन डिलिव्हरी



ब्वॉयला न्यायालयाने सोमवारी (ता. २१) २३ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

अतिक बेग अनिस बेग (वय ३०, रा. तालाबपुरा) आणि मोहम्मद रिजवान अब्दुल गणी (वय २८, रा. अकबरनगर) अशी पोलीस कोठडी मिळालेल्या युवकांची नावे आहेत.अतिक बेग शहरातील ग्राहकांना एमडी ड्रग्ज पुरवित असल्याच्या माहितीवरून गुन्हे शाखेच्या युनिट २च्या पथकाने दरम्यान रविवारी सायंकाळी अतिक हा नेहरू मैदानात ऑटोरिक्षाने (एमएच २७ बीडब्ल्यू १६११) पोहोचताच त्याला पकडले होते. त्याच्याकडे एमडी ड्रग्ज आणि ऑटोचालकाकडे ईलेक्ट्रीक वजन दुसऱ्याने विक्रीकरिता दिल्याचे त्यांनी काटा आढळला होता. एमडी ड्रग्ज सांगितले होते.गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्यासह सहायक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, अमोल कडू, पोलीस उपनिरीक्षक संजय वानखडे, पोलीस अंमलदार महेंद्र येवतीकर, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, सागर ठाकरे, चेतन कराडे, संदीप खंडारे, राहुल दुधे, चेतन शर्मा, वर्षा घोंगळे यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

# जिल्हा परिषद पं.स. गणावर ७ तालुक्यांतुन १४ आक्षेप

## २८ जुलैपर्यंत विभागीय आयुक्त कार्यालयात होणार सुनावणी

### ११ ऑगस्ट रोजी सुनावणीवर निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२२अमरावती–** निवडणूक विभागाच्या वतीने जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांच्या अनुषंगाने १४ जूलै रोजी ५९ झेडपी गट व ११८ पंचायत समितीच्या गणाची प्रारुप प्रभाग रचना जाहीर करण्यात आली. या प्रभागरचनेवर २१ जूलैपर्यंत आक्षेप व हरकती स्विकारण्याची संधी प्रशासनाकडून देण्यात आली होती. या दरम्यान सात तालुक्यांतून १४ आक्षेप दाखल झाले आहेत. यामध्ये १३ आक्षेप हे जिल्हा परिषद गट व एक आक्षेप चांदूर रेल्वे तालुक्यात पंचायत समिती गणावर प्राप्त झाले आहे. जिल्ह्यात २०१७ साली निश्चित करण्यात रचनेनुसारच यंदाच्या निवडणुका घेण्यात येणार आहेत. चांदूर रेल्वे आलेल्या प्रभागआणि अचलपूर सर्कलमध्ये बदल करीत झेडपीचे ५९ सर्कल आणि पंचायत समितीचे ११८ गण कायम ठेवण्यात आले आहे. सोमवार, १४ जुलैरोजीप्रभागरचनेची प्रारुप यादी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद व १४ पंचायत समितीस्तरावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. यावर २१ जुलैपर्यंत आक्षेप व हरकती स्वीकारण्यात आल्या. यामध्ये धारणी, दर्यापूर तालुक्यांत प्रत्येकी एक आक्षेप दाखल झाला असून चिखलदरा, मोर्शी, तिवसा, भातकुली येथे प्रत्येकी दोन आक्षेप तर चांदूर रेल्वे तालुक्यात तीन तक्रारी प्राप्त आहे. याचतालुक्यात पंचायत समिती गणावर देखील आक्षेप दाखल करण्यात




आला आहे. या आक्षेपांवर २८ ऑगस्ट रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात अभिप्राय नोंदवून ११ ऑगस्टरोजी यावर निर्णय होणार आहे. त्यानंतर १८ ऑगस्ट रोली अंतिम प्रभाग रचना जाहीर केली जाणार आहे

# महिलांच्या हितासाठी एकत्रितपणे कार्य करावे-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

***विदर्भ प्रजासत्ताक***
***दि.२२अमरावती,***

*महिला व बालविकास विभाग हा शासनासाठी अत्यंत महत्वाचा विभाग आहे. महिलांच्या सर्वांगीण विकास आणि उत्थानासाठी शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण, चाईल्ड हेल्पलाईन, बाल विवाह प्रतिबंध, बाल संरक्षण संस्थेची त्रैमासिक सभा, कोवीडमुळे पालकत्व गमाविलेल्या बालकांची काळजी व संरक्षण कृती दल सभा, पुनर्वसन समितीची त्रैमासिक सभा, अपराधी परिविक्षा अधिनियमानुसार सभा, महिला सल्लागार समितीची त्रैमासिक सभा पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, विभगीय महिला व बालविकास अधिकारी विलास मसराळे, जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी अतुल भडांगे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, महिलांच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. यामुळे महिला विकासात योगदान देऊ शकतील. अल्पवयात लग्न, मुले होणे,*



*घरगुती हिंसाचार यामुळे महिलांचे खच्चीकरण होत असून विभागाने महिलांकडे पाहण्याचा कल बदलविण्या साठी कार्य करणे गरजेचे आहे. यात प्रामुख्याने बाल विवाह रोखल्यास निर्माण होणाऱ्या समस्या निकाली निघू शकतील. महिलांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिल्यास त्या आत्मनिर्भर होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे त्यांना पारंपारिक प्रशिक्षणापेक्षा वेगळे प्रशिक्षण देण्यात यावे. येत्या पिढीला अंमली पदार्थापासून वाचविणे आवश्यक आहे. त्यामुळे पोलिसांनी कार्यवाही वाढवावी. शाळांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्रीवर बंदी आहे. याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. याबाबत शिक्षणाधिकारी यांनी खातरजमा करावी. तसेच मुलांसाठी असलेल्या चाईल्ड हेल्पलाईनची माहिती प्रत्येक शाळेत देण्यात यावी. अल्पवयीन मुलांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करताना त्याची माहिती बाल संरक्षण कक्षास देण्यात यावे. यामुळे त्यांचे समुपदेशन होऊ शकेल. रेल्वेस्टेशनप्रमाणे महत्वाच्या बसस्थानकावरही मुलांसाठी मदत कक्ष उभारण्याच्या सूचना करण्यात आल्या. महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे महिलांच्या उद्योजकतेला वाव देण्यात येत आहे. त्यांच्यातर्फे निर्मित वस्तूंना बाजारपेठेत चांगली मागणी आहे. त्यामुळे महिलांमध्ये उद्योजकता वाढावी यासाठी आरसेटी, जिल्हा उद्योग केंद्र या प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचा उपयोग करून घ्यावा. महिलांच्या विकासाठी विभाग म्हणून भूमिका महत्वाची राहणार आहे. त्यामुळे येत्या काळात परिणामकारक ठरतील, अशा कामांना प्राधान्य द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.*

# विठ्ठलवाडीतील भूखंडाचा वाद चिघळण्याची शक्यता

# खुल्या प्लॉटवरून ये-जा करण्यावरून निर्माण झाला वाद;

## कंपाऊंडसाठी अचलपूर नगर परिषदेकडे परवानगीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अचलपूर :** अचलपूर शहरातील विठ्ठलवाडी या रहिवासी वसाहतीतील प्लॉट क्र. १२ संदर्भात रस्त्यावरून जाण्या-येण्याचा वाद दिवसेंदिवस तीव्र होत चालला आहे. प्लॉटसमोरील पश्चिम बाजूने अधिकृत लेआऊटनुसार रस्ता उपलब्ध असतानाही, काही रहिवासी मागील बाजूस असलेल्या खुल्या प्लॉट (क्र. ११) वरून ये-जा करण्याचा हट्ट धरत असल्याची माहिती पुढे आली आहे. सदर खुला प्लॉट हा विलास थोरात यांचा असून, त्यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने या प्लॉटवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. तसेच, आता या प्लॉटवर कंपाऊंड बांधण्यासाठी नगर परिषदेकडे परवानगीची मागणी केली आहे.

**लेआऊटमध्ये अनियमिततेची शक्यता**

मौजे अचलपूर शहराच्या शीट क्र. २१ मध्ये असलेल्या प्लॉट क्र. ११ संदर्भात धक्कादायक बाब समोर आली असून, संजय कमलाकर देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेऊन नियमानुसार लेआऊट तयार करणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात त्यांनी नियमनाला बगल देत एकाच जागेत २० ते २२ प्लॉट पाडून, खुली जागा आणि सर्व्हिस गल्ल्यांसह प्लॉट विक्री केली. त्यामुळे अनेक रहिवासी फसवले गेले. यानंतर नगर परिषदने २००६ मध्ये निर्णय घेत सदर प्लॉट्सना नियमित करण्याचा ठराव केला आणि महाराष्ट्र गुंठेवारी कायदा २००१ तसेच सुधारित २०२३ च्या अधिनियमानुसार पी.आर. कार्ड प्रक्रियेची अंमलबजावणी जिल्हाधिकारी अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केली आहे.

नगर अभियंत्यांची पाहणी – तरीही परवानगी रखडली

प्लॉट क्र. १२ चे रहिवासी – राजेश, देवानंद आणि अमोल आवणकर – यांच्याकडे पश्चिम बाजूस अधिकृत रस्ता असतानाही, त्यांनी पूर्वेकडील विलास थोरात यांच्या खुल्या प्लॉटवरून जाण्यासाठी हट्ट धरला आहे. या गोष्टीमुळे वाद विकोपाला गेला आहे. सततच्या त्रासामुळे विलास थोरात यांनी नगर परिषदेकडे कंपाऊंड बांधण्यासाठी परवानगी मागणारे अनेक अर्ज सादर केले आहेत.



प्रभारी नगर अभियंता मनीष चोमवाल (शर्मा) यांनी दोन्ही प्लॉटचे गुंठेवारी नकाशे तपासून थेट घटनास्थळी जाऊन पाहणी केली. या पाहणीत त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, थोरात यांच्या खुल्या प्लॉटवरून जाण्याची गरज नाही, कारण पश्चिमेकडून अधिकृत रस्ता उपलब्ध आहे. तरीही या चौकशीला पंधरा दिवस उलटून गेले, परंतु कंपाऊंडसाठी परवानगी अद्याप मिळालेली नाही.

विलास थोरात यांनी सादर केलेल्या निवेदनात सांगितले आहे की, जर या अनावश्यक वादामुळे पुढील काळात काही अप्रिय घटना घडली, तर त्यास जबाबदार नगर अभियंता असतील. हे निवेदन उपविभागीय अधिकारी, स्थानिक आमदार आणि खासदार यांना देखील पाठवण्यात आले आहे.

### सामान्य नागरिकांमध्ये संताप आणि चिंतेचं वातावरण

स्थानिकांमध्ये याबाबत तीव्र संताप असून चर्चांना उधाण आले आहे की, जेव्हा जमीन वहीवटीत आहे, टॅक्स भरला जातो आणि गुंठेवारी मोजणी झाली आहे, तरीही नगर परिषद कंपाऊंडची परवानगी देण्यात विलंब का करत आहे? प्रशासन एखाद्या अप्रिय घटनेची वाट पाहत आहे का, असा सवाल निर्माण झाला आहे.बॉक्स –माझ्या घराच्या वापरासाठी असलेली खुली जागा ही माझ्या वहीवटीत असून, त्याचा मी नगर परिषदेला नियमित कर भरतो. गुंठेवारी मोजणी देखील झालेली आहे. तरीदेखील मागील शेजारी विनाकारण वाद निर्माण करून त्या जागेतून जाण्याचा अट्टाहास धरतात. मी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे लावले असून आता कंपाऊंड बांधणे अत्यावश्यक झाले आहे. त्यामुळे मी नगर परिषदेकडे परवानगी मागितली आहे.

– विलास थोरात, प्लॉट वहीवट धारक, विठ्ठलवाडी, अचलपूर.

## श्री क्षेत्र नागरवाडी येथे नवी दिल्ली येथील संत साहित्य अभ्यासक प्रा.डॉ.जनार्दन पाटील यांची सदिच्छा भेट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२चांदूरबाजार**
कर्मयोगी श्री संत गाडगेबाबांचे अंतिम श्रद्धास्थान असलेल्या श्री गाडगे महाराज संस्था श्रीक्षेत्र नागरवाडी येथे नवी दिल्ली येथील संत साहित्य अभ्यासक प्रा.डॉ.जनार्दन पाटील यांची सदिच्छा भेट दिली यावेळी संस्थेचे सर्वेसर्वा तथा नागरवाडी इंद्रभवनाचे शिल्पकार बापूसाहेब देशमुख समवेत संचालक श्री.सागरभाऊ देशमुख यांनी त्यांचे यथोचित असे स्वागत केले. तदपश्चात उपस्थित मान्यवरा श्री.पाटील सर यांनी नागरवाडी इंद्रभुनाची पाहणी केली असता संस्थेचे सुरू असलेले सेवाभावी व ज्ञानदानाचे कार्य पाहून समाधान व्यक्त केले.सरते शेवटी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना सुंदर मिष्ठान्न भोजन देण्यात आले.यावेळी समाज प्रबोधनकार ह.भ.प. भरत महाराज रेळे, श्री गाडगे महाराज समाधी मंदिर येथील व्यवस्थापक प्रकाश महात्मे, शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.-

# महालक्ष्मी ज्वेलर्समधून दागिने चोरणारी बुरखाधारी महिला जेरबंद



## हातचलाखी पाहताच पटली ओळख, ३.८४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**
राजकमल चौकातील महालक्ष्मी ज्वेलर्समधून ३ लाख ८४ हजार ५९३ रुपयांचे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या महिलेला गुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाने २४ तासाच्या आत अटक करून चोरीचा मुद्देमाल जप्त केला. सीसीटीव्ही कॅमेऱ्यातमहिलेची हातचलाखी पाहताच पोलिसांना तिची ओळख पटली होती.

गौरव राजकुमार कोटवानी यांच्या मालकीचे राजकमल चौकात महालक्ष्मी ज्वेलर्स नावाने दुकान आहे. १८ जुलै रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास काळ्या रंगाचा बुरखा व ग्रे रंगाचा दुप्पटा परिधान करून एक महिला सोन्याचे दागिने खरेदी करण्याचा बहाण्याने दुकानात आली होती. तेव्हा दुकानातील सेल्सगर्लने महिलेला सोन्याचे वेगवेगळे दागिने दाखविले.

दरम्यान महिलेने दुकानातील सेल्सगर्लचे लक्ष दुसरीकडे वळवून २५.२१० व २५.२१० ग्रॅमचे दोन सोन्याचे पॅन्डल असा एकूण ३ लाख ८४ हजार ५९३ रुपयांचा मुद्देमालहातचलाखीने लंपास केला आणि दुकानातून निघून गेली.काही वेळाने सोन्याचे दागिने चोरी गेल्याचे सेल्सगर्लच्या लक्षात येताच तिने दुकान मालकाला सांगितले. त्यांनी तत्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि घडलेला प्रकार पोलिसांना सांगितला. या घटनेत पोलिसांनी गुन्हा दाखल करून महिलेचा शोध सुरु केली. दरम्यान गुनहे शाखा युनिट १ चे पथकसुध्दा समांतर तपास करीत होते. घटनेनंतर पथकातील अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांनी दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची बारकाईने पाहणी केली असता बुरखा घातलेल्या महिलेचा चहरा दिसत नव्हता. परंतु ती ज्या पध्दतीने सेल्सगर्लला दागिने दाखवायला सांगत होती आणि दागिने पाहताना त्यावर हात फिरवित होती, हे पाहताच महिला अकोला जिल्ह्यातील अकोट फैल येथील असल्याचा संशय आला.पोलिसानी लगेच त्या महिलेचे घर गाठले आणि तिला ताब्यात घेऊनकसून चौकशी सुरू केली. यावेळी तिने चोरीचा गुन्हा कबुल केला. त्यानंतर पोलिसांनी महिलेच्या घरातून दागिने जप्त करून तिला अटक केली.या कारवाईत गुन्हे शाखा युनिट १ चे अधिकारी गोरखनाथ जाधव, सहायक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, इम्रान नायकवाडे, पोलीस अंमलदार फिरोज खान, सतीश देशमुख, सचिन बहाळे, प्रशांत मोहोड, अलीमउद्दीन खतीब, नाझीमउद्दीन सैयद, विकास गुडधे, सचिन भोयर, रणजीत गावंडे, सुरज चव्हाण, निखील गेडाम, अशोक खंगार आणि किशोर खेंगरे यांचा समावेश होता.

### महिला पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार

अटकेतील महिला सराईत चोर असून तिच्याविरूध्द यापूर्वीचेही चोरीचे गुन्हे दाखल आहेत. एक वर्षाआधी याच महिलेने अमरावती सराफा बाजार येथील एका ज्वेलर्समधून सोन्याचे दागिने चोरी केले होते. त्यामुळे शहर पोलीस तिच्या चोरीच्या पध्दतीबाबत अवगत होते. त्यामुळेच बुरखा घातल्यानंतरही पोलिसांना तिला ओळखता आले.

## जिल्ह्यातील घरकुलांना मोफत वाळू वाटपाला वेग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती,**
पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील घरकुलांना पाच ब्रास वाळू वाटपाला वेग आला आहे. आतापर्यंत साडेनऊ हजार ब्रास वाळूचे वितरण ७ हजार ७१० लाभार्थ्यांना करण्यात आले आहे. वाळू वितरणाची प्रक्रिया वेगात सुरू झाल्याने घरकुल लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांना वाळू वितरणाची प्रक्रिया वेगात सुरू असून विविध पाच टप्प्यात वाळूचे वितरण करण्यात येत आहे. आतापर्यंत जिल्ह्यात ५४ हजार ९४९ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी ७ हजार ७१० लाभार्थ्यांना ९ हजार ४२७ ब्रास वाळूचा पुरवठा करण्यात आला आहे. जिल्ह्यात घरकुलांच्या बांधकामासाठी एकूण २ लाख १५ हजार १४ ब्रास वाळूची मागणी नोंदविण्यात आली आहे. जिल्ह्यामध्ये स्थानिक वापरासाठी १६५ वाळू गट राखीव ठेवण्यात आले आहे. त्यातून ५४ हजार ९१८ ब्रास वाळूसाठा उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, एकही वाळू गट अद्यापही लिलावात विकल्या गेलेला नाही,



त्यामुळे हा संपूर्ण साठा घरकुल लाभार्थ्यांसाठी उपलब्ध आहे.

तालुकानिहाय वाळू वाटपाचा तपशील (लाभार्थी संख्या आणि वाटप झालेली वाळू ब्रासमध्ये) अमरावती-१५ लाभार्थी, ७५ ब्रास, तिवसा-३१, लाभार्थी, १२१ ब्रास, भातकुली- ७५१ लाभार्थी, ७५९ ब्रास, चांदूर रेल्वे- ३०६ लाभार्थी, ३५५ ब्रास, नांदगाव खंडेश्वर- ३९९ लाभार्थी, ४३० ब्रास, धामणगाव रेल्वे- २०८ लाभार्थी, २४१ ब्रास, मोर्शी- ४५८ लाभार्थी, ४५८ ब्रास, वरुड- ४७९ लाभार्थी, ४९० ब्रास, दर्यापूर- २६५ लाभार्थी, ६२८ ब्रास, अंजनगावसुर्जी- ३५० लाभार्थी, ३५० ब्रास, अचलपूर- २ हजार ७३१ लाभार्थी, २ हजार ९९१ ब्रास, चांदूरबाजार-२१७ लाभार्थी, १ हजार २९ ब्रास, धारणी- १ हजार ५०० लाभार्थी, १ हजार ५०० ब्रास, चिखलदरा-० लाभार्थी, ० ब्रास.

## श्री क्षेत्र सावंगा विठोबा येथे २४ जुलैला श्रावण मास शुभारंभ चंदनउटी उत्सव, भाविकांचा उसळणार जनसागर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२चांदूरेल्वे-** सुप्रसिध्द श्री क्षेत्र सावंगा विठोबा येथील श्री कृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे २४ जुलै रोजी सकाळी ५ वाजता श्रावण मास मांडीची अखंड भजन सुरुवात लहान मंदिरात डाल बसवून मुख्य मंदिरात महाराजांच्या गणाने विश्वस्त मंडळ आणि भाविक भक्तांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे तर दुपारी वाजता संस्थानच्या वतीने अमावस्यानिमित्त चंदन ऊटी उत्सव आयोजित केला आहे.कार्यक्रमाकरिता बाहेरगावातील भक्तांसाठी संस्थानचे वतीने अनदान समितीच्या नियंत्रणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रावण मास मांडीमध्ये बाहेरगावातील अवधूत भजन मंडळांचा दैनंदिन सहभाग राहणार आहे. त्याकरीता संस्थानच्या वतीने २४ जुलै ते २४ ऑगस्ट या कालावधीचे भजन पाळीचे नियोजन तयार करण्यात आले आहे. या सहभागी अवधूत भजन मंडळाकरिता संस्थानच्या वतीने चहा, नाश्ता आणि भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच श्रीफळ देऊन मंडळांचा सत्कार आणि नवीन सहभागी




मंडळांना महाराजांची गाथा भेट देण्यात येणार आहे. बाहेरगावच्या संस्थानचे भाविकांकरिता अन्नदान समितीच्या वतीने रोज दुपारी १२ ते १.३० आणि रात्री ८ ते ९.३० या वेळात प्रसाद (भोजन) चे वितरित करण्यात येत आहे. याकरिताप्रसादालया मध्ये प्रसाद देणगी पावती घेऊन भाविकांनी प्रसादाचा लाभ घ्यावा. इच्छूक अनदानदात्यांनी अप्रदान देणगी देवून अप्रदान करता येईल, याकरिता संस्थानशी संपर्क साधावा, तसेच सर्व भाविक मक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड प्रविण चरणदास कांडलकर, कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी व समस् विश्वस्त मंडळाने केले केले.

# मोर्शी विभागाने मोहिम घेत वीज खांबासहीत वाहिन्या,रोहित्रे केली वेलीमुक्त

## सुरक्षित आणि सुरळीत वीज पुरवठ्यासाठी महावितरणचे प्रयत्न, ३३५ उच्चदाब, २५८ लघुदाब आणि १४२ रोहित्रावरील काढल्या वेली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती,**
पावसाळ्यात वीजखांबावर व रोहीत्रावर चढणाऱ्या वेलीचे प्रमाणही जास्त असते. त्यामुळे अखंडित वीज पुरवठ्याला अडथळा ठरणाऱ्या व प्रसंगी अपघातालाही निमंत्रण देणाऱ्या वेली व झाडे-झुडूपे काढण्याची मोर्शी विभागाने मोहिम हाती घेत काल एकाच दिवशी ५९३ वीज खांब व वाहिन्यावरील आणि १४२ रोहित्रावरील वेली काढण्यात आल्या आहे.

महावितरणची यंत्रणा उघड्यावरच आणि वनारानत असे सर्वदुर पसरली असल्याने अनेक ठिकाणीची रोहीत्रे आणि वीज खांबे ही वेली तसेच झुडूपे यांच्या विळख्यात वारंवार अडकतात आणि वीज यंत्रणा असुरक्षित करतात. परिणामी थोडी जरी हवा आली तरी खंडित वीज पुरवठ्याला सामोरे जावे लागते ,शिवाय वेली व झुडूपे ही ओली असल्यामुळे यात व खांबाला लावलेल्या तानात वीज प्रवाह उतरण्याची शक्यता अधिक असते ,आणि हे अपघाताचे कारण बनू नये म्हणून जिल्हयात सुरक्षित वीज यंत्रणेतून वीज पुरवठा करण्यासाठी मुख्य अभियंता अशोक साळुंके आणि अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात



वेलीमुक्त वीज यंत्रणा करण्यासाठी मोहिम हाती घेण्यात आली आहे.

कार्यकारी अभियंता विजयकुमार कासट यांनी पुढाकाराने काल (दि.१९ जुलै) एकाच दिवशी मोर्शी विभागात मोहिम राबविण्यात आली.या मोहिमेत महावितरणसह कंत्राटदार कर्मचाऱ्यांचीही मदत घेण्यात आली आणि एकाच दिवसात विभागातील ३३५ ठिकाणावरील उच्चदाब वाहिन्यावर चढलेली,२५२ लघुदाब वाहिन्या आणि वीज खांबावरील आणि १४२ रोहित्रावर चढणाऱ्या वेली आणि झुडूपे काढून विभागातील संपूर्ण यंत्रणा वेलीमुक्त करण्यात आली.

मोर्शी विभागातील उपविभाग निहाय आकडेवारीनुसार मोर्शी उपविभ -१ मध्ये वेलीमुक्त झालेल्या वीज यंत्रणेत ८३ उच्चदाब आणि २४ लघुदाब वाहिन्या व वीज खांबासह २१ रोहित्राचा समावेश आहे.मोर्शी उपविभाग -२ मध्ये उच्चदाब ३५,लघुदाब ५०आणि रोहित्रे १७,चांदुरबाजार उपविभाग उच्चदाब ६४, लघुदाब ५५ आणि रोहित्रे ३२, वरूड -१ उपविभागात उच्चदाब ७८ ,लघुदाब ३६ ,रोहित्रे १३,वरूड उपविभाग -२ मधील उच्चदाब ४२,लघुदाब ५२ ,रोहित्रे ३७ आणि शेंदुरजना घाट उपविभागातील ३३ उच्चदाब वाहिन्या व वीज खांब,४० लघुदाब वाहिन्या व वीज खांब आणि २२ रोहित्रावरील वेली व झुडूपे काढून वेलीमुक्त व झुडूपे मुक्त करण्यात आली आहे.

# डोळ्यांची पट्टी काढताच निराधार झाले डोळस

## शस्त्रक्रियेनंतर स्पष्ट दिसायला लागले; महापालिकेचा अभिनव उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

आपल्या डोळ्यांनी हे सुंदर जग बघावे असे कोणालाही वाटते. परंतु, समाजात असे अनेक लोक आहेत, ज्यांची इच्छा असूनही त्यांना अनेक गोष्टी शक्य होत नाही. विशेषत: निराधार, दिव्यांगांना तर त्यांच्या इच्छा माराव्या लागतात. परंतु, महापालिकेतर्फे बडनेरा येथे सुरू करण्यात आलेले निराधारांचे आधार केंद्र हे अनेकांसाठी वरदान ठरले आहेत. या केंद्रातील चार निराधारांच्या डोळ्यावर सोमवार, २१ जुलै रोजी यशस्वीपणे शस्त्रक्रिया केल्यानंतर त्यांना दिसायला लागले. त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. डोळ्यांची पट्टी काही वेळासाठी उघडल्यानंतर सुंदर जग बघून चार निराधारांनी उपस्थितांना मिठीच मारली.

राष्ट्रीय उपजीविका अभियान अंतर्गत बडनेरा येथील आधार शहरी बेघर लोकांसाठी असलेल्या निवारा केंद्रात राहणारे ज्येष्ठ नागरिक ज्यांना मागील कित्येक दिवसांपासून डोळ्याने फारच कमी दिसत होते. आज त्यांच्या डोळ्यांची काच बिंदू व मोती बिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे डॉ. टेकाडे यांच्या नेतृत्वात डॉ. श्रद्धा तट्टे व त्यांच्या टीमने आधार केंद्रात राहणारे गीता सोमलवार, प्रमोद नगराळे, महादेव नगराळे, उषा मेश्राम अशा चार जणांच्या डोळ्यांवर शस्त्रक्रिया केली.

# शेतकऱ्याची विष पाजून हत्या ३ आठवड्यानंतर गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अचलपूर**

५ जून २५ रोजी विष पाजलेल्या शेतकऱ्याचा २८ जून २५ रोजी अमरावती येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. गजानन उत्तमराव काळे (५८) असे विष पाजून ठार केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी शिरजगाव कसबा पोलिसांनी १८ जुलै रोजी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे, तसेच गवई नामक रखवालदार, गुंजन जैन (४७) रा. इंदोर, सुरेश खडके (४०) रा. टेबुरसोडा व एक अनोळखी व्यक्ती अशा चौघांविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.



कविठा येथील शेतकरी गजानन उत्तमराव काळे यांच्या पत्नी सौ. शालिनी (५४) या दुपारच्या सुमारास शेतात गेल्या असता त्यांना शेताच्या टोकावर झोपडीजवळ त्यांचे पती गजानन हे जमिनीवर पडलेले दिसले. त्याच वेळी शेतातील टिनाच्या झोपडीत राहणारा रखवालदार गवई, एका अनोळखी व्यक्तीसह दोन व्यक्ती हे शेताच्या बाहेर पळून जाताना सौ. शालिनी यांनी पाहिले सौ शालिनी यांनी निपचित पडलेल्या पतीकडे धाव घेत त्यांना विचारपूस केली असता रखवालदार गवई व अन्य एकाने जबरदस्तीने विषारी द्रव्य पाजल्याचे पतीने त्यांना सांगितले.गंभीरावस्थेत काळे यांना तातडीने अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथून त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. २६ जून रोजी त्यांचे मृत्यूपूर्व बयाण नोंदविण्यात आले. त्यामध्ये त्यांनी विष कुणी पाजले, याबद्दल घटनाक्रम सांगितला, त्यानंतर २८ जुलै रोजी त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर शिरजगात कसबा पोलिसस्टेशन ला ३० जून रोजी उपस्थित राहून सौ शालीनी यांनीतकार देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतरही मृताच्या नातेवाईकांसह गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याच्या भेटी घेत गुन्हा नोदविण्याची मागणी केली. मृत्यूपूर्व बयाण असूनही गुन्हा नोंदविण्यास विलंब होत असल्याने नातेवाईक त्रस्त होते. शेवटी १८ जुलै रोजी म्हणजेच ३ आठवड्यानंतर शिरजगाव कसबा पोलिसांनी हत्येच्या गुन्ह्याची नोंद केली. गुन्ह्यातील आरोपींना तत्काळ अटक करावी, अशी मागणी मृतकाच्या कुटुंबियासह गावातील दक्ष लोकांनी केली आहे.

# सुरवाडीच्या जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थी संख्या वाढली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२ तिवसा**

राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी भेट दिलेल्या तिवसा तालुक्यातील सुरवाडी खुर्दच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थी संख्येत सीबीएससी पॅटर्नमुळे २० विद्यार्थी वाढले आहेत.

अतिशय सुंदर व स्वच्छ परिसर असलेल्या या सुंदर शाळेत खुद्द पालकांनी पहिल्या वर्गात मुलांना प्रवेशित करून खाजगी वाहनाद्वारे आणून देण्याची तयारी आखली आहे. जि.प. प्राथमिक शाळेत सीबीएससी पॅटर्न सुरू होताच पालकांचा जिल्हा परिषद शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या दिवसेंदिवस घटत असताना दिसून येत आहे. परिणामी शाळा बंद पडण्यावर असताना हे चित्र बदलण्यासाठी आता प्रत्येक शाळेत सुद्धा इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचा चांगला प्रभाव जि. प. शाळेवर पडत आहे. तिवसा तालुक्यातील सुरवाडी शाळेत सीबीएससी पॅटर्न लागू होताच गोरगरीब, सर्वसामान्य, मध्यम घरची, सर्वच कुटुंबातील मुले या शाळेत दाखल झाले आहे. सुरवाडी शाळेच्या आजूबाजूला इंग्रजी माध्यमाच्या ८ ते १० शाळा असताना सुरवाडीत मुलांना प्रवेशित करण्याची पालकांनी तयारी दर्शविली आहे.

> माझी शाळा' समजून शाळेवर लक्ष केंद्रित केले सुरवाडी खुर्द येथील ही शाळा ही माझी शाळा' समजून त्या शाळेवर अधिक लक्ष केंद्रित करून सुंदर' बनविले आहे. शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी देखील शाळेला भेट दिल्यानंतर कौतुक केले होते. या शाळेत मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पाऊले उचलल्या जात आहे. त्यामुळे पालकांचा जिल्हा परिषद शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. पालक मुलांना शाळेत सोडवण्यासाठी येतात.
>
> **– दलविर व्यास ,**
> **मुख्याध्यापक,**
> **सुरवाडी खुर्द**

# पळून गेलेला आरोपी निमदरी येथे सापडला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अचलपूर**

पोलिसांना गुंगारा देऊन पळून गेलेला आरोपी नामदेव याला निमदरी येथे बेड्या घालण्यात परतवाडा पोलिसांना यश आले आहे. सकाळी गोपनीय माहितीवरून पोलिसांनी निमदरी येथे जाऊन रचलेल्या सापळ्यात नामदेव बळीराम दहिकर अडकला.



पोलिस पाटील देवेंद्र खंडेझोड यांच्या मालकीच्या म्ह सोना येथील शेतात नामदेव याने त्याच्या सख्ख्या भावावर हल्ला करीत त्याला गंभीर जखमी केल्याप्रकरणी नामदेव याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला घटनास्थळी चौकशीसाठी पोलिस पथक घेऊन गेले असता आरोपी १८ जलै २५पोलिसांनी मोठे सर्च ऑपरेशन राबवून सतत ३ दिवस संपूर्ण परिसर पिंजून काढला. तो हट्टीघाट परिसरात दिसल्याची चर्चा होती: मात्र तो २१ जुलै रोजी निमदरीमध्ये पोलिसांनी पकडला.आरोपी नामदेव याला अचलपूर येथील उपजिल्हा वैद्यकीय रुग्णालयात तपासणीसाठी नेण्यात आले आहे. त्यानंतर त्याला न्यायालयात हजर केले जाणार आहे. आरोपी नामदेव याला शोधण्यासाठी पोलिसांची चांगलीच दमछाक झाली. आरोपीला पकडण्याचे फार मोठे आव्हान पोलिसांपुढे होते.आरोपीला पकडण्यात अखेर यश आल्याने पोलिसांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

# परतवाड्यातील कृषी कार्यालय चिखलदरा येथे हलविण्याचा घाट

## हजारो शेतकऱ्यांना होणार त्रास




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अचलपूर**

मेळघाटातील शेतकऱ्यांच्या कृषी कार्यालय परतवाडा येथून चिखलदरा येथे हलविण्याचा घाट घातला जात असून या महिन्याच्या अखेर कार्यालय हलविण्याचे सोपस्कार पूर्ण होणार असल्याची खात्रीलायक माहिती आहे. शेतकऱ्यांच्या हितार्थ परतवाडा येथे सदर कार्यालय स्थापित करण्यात आले होते.

चिखलदरा कृषी कार्यालयाची अचलपूर बाजारसमितीमध्ये प्रशस्त इमारत असून सन १९९८ पासून चिखलदऱ्याच्या शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना याच कार्यालयातून राबविण्यात आल्या आहे. २७ वर्षाची यशस्वी परंपरा लाभलेल्या सदर कार्यालयावर राजकीय नेत्यांची नाराजी आहे. वास्तविक सदर कार्यालय चिखलदऱ्यापेक्षा परतवाडा येथे असणे शेतकऱ्यांच्या सोयीचे असल्याने शेतकऱ्यांच्या मागणीची दखल वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतली होती. त्यामुळेच मागील २७ वर्षापासून सदर कार्यालय शहरात आहे.

गुरुवार या आठवडी बाजाराच्या दिवशी हजारो शेतकरी परतवाडयात खरेदीसाठी आणि कृषिमालाच्या विक्रीसाठी येत असतात. शेती संबंधी खर्चासाठी लागणाऱ्या पैशाची व्यवस्थासुद्धा ते याच शहरातून करतात. चिखदऱ्यातील शेतकऱ्यांना बियाणे, खते, कीटकनाशके परतवाडा शहरातून घ्यावी लागते. खाजगी दवाखाने, महाविद्यालय येथेच आहे. तात्पर्य असे की जास्तीत जास्त शेतकऱ्यांची वहिवाट परतवाडा शहरातच आहे. त्यामुळे येथेच कार्यालय असावे, अशी शेतकऱ्यांसह काही राजकीय नेत्यांची मागणी होती आणि म्हणूनच सदर कार्यालय हलविण्याचा निर्णय घेण्याचे धाडस कुणी दाखविले नाही: मात्रनुकत्याच कार्यालय हलविण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहे. चिखलदरा येथे तयार झालेल्या नवीन इमारतीत सदर कार्यालय थाटण्याची प्रक्रिया सुरू आहे. या आत्मघाती निर्णयामुळे आदिवासी शेतकऱ्यांना फार मोठा मनस्ताप सहन करावा लागणार आहे. सदर कार्यालय हलविण्यापूर्वी आधी शेतकऱ्यांकडून ना हरकत घ्यावी, असेही बोलले जात आहे.

भौगोलिक क्षेत्र २ लाख ४७ हजार ६९७, खरीप पेरणी क्षेत्र २४ हजार २७४, खातेदार शेतकरी संख्या १३ हजार ४५२ इतकी आहे. यापैकी बहुतांश शेतकरी परतवाडा शहराशी दळणवळण करणारे आहेत.

> सदर कार्यालय चिखलदरा येथे आणावयाचे असल्याने त्यासंदर्भात तहसीलदार चिखलदरा यांच्याशी चर्चा केली असून लवकरच सदर कार्यालय हलविण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.
>
> 
>
> **केवलराम काळे,**
> **आमदार, मेळघाट**

# भारतीय ज्ञानप्रणाली या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेचा समारोप

## शिक्षण क्षेत्राला नवसंजीवनी देणारा दृष्टिकोन हवा आहे : डॉ. मनीषा कोडापे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

शिक्षण क्षेत्राला नवसंजीवनी देणारा दृष्टिकोन हवा आहे. केवळ पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीचे अंधानुकरण न करता भारतीय ज्ञान परंपरेतील उज्ज्वल आणि उन्नत दृष्टिकोन समकालीन शिक्षणात समाविष्ट करणे काळाची गरज आहे, असे मत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य प्रा.डॉ. मनीषा कोडापे यांनी व्यक्त केले. त्या 'ज्ञानाचे पुनरुज्जीवन : समकालीन शिक्षणात भारतीय ज्ञान प्रणाली' या विषयावरील पाच दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी अध्यक्षीय भाषण करताना बोलत होत्या.



दिनांक १४ ते १८ जुलै २०२५ या कालावधीत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभाग आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मालवीय मिशन टीचर ट्रेनिंग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत ही राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत दररोज सकाळी १०.३० ते संध्याकाळी ५.३० या वेळेत विविध सत्रांद्वारे भारतीय ज्ञान परंपरेचा समकालीन शिक्षणात उपयोग, त्याचे महत्त्व व उपयोजन यावर सखोल विचारमंथन झाले. कार्यशाळेत आचार्य श्रेयस कुऱ्हेकर, डॉ. संदीप वाघुळे, डॉ. स्वानंद पुंड, डॉ. प्रणव कोलते, डॉ. अविनाश मोहरील, डॉ. श्वेता बडगुजर, डॉ. नितीन फिरके, डॉ. वर्षा नाठार, डॉ. राहुल लोधा, डॉ. रवींद्र मुंद्रे, डॉ. मनीषा कोडापे यांसारख्या विषयतज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

सत्रांमध्ये भारतीय तत्त्वज्ञान, पर्यावरणदृष्टी, आरोग्य परंपरा, नीतिशास्त्र, लोकपरंपरा, सूक्ष्मजीवशास्त्र, वनस्पतिशास्त्र, बुद्ध तत्त्वज्ञानातील विचारप्रवाह, धातूशास्त्र, आणि शैक्षणिक मूल्ये या विषयांवर व्याख्यान, संवाद, चर्चा आणि कार्यशाळात्मक उपक्रम राबविण्यात आले. प्रास्ताविक कार्यशाळेचे सहसमन्वयक डॉ. प्रणवकोलते यांनी केले. त्यांनी कार्यशाळेच्या उद्दिष्टांची माहिती देत सांगितले की, भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यास हा केवळ ऐतिहासिक दस्तऐवजांपुरता मर्यादित नसून, ती एक सजीव, अनुभवाधारित आणि सर्वस्पर्शी ज्ञानसंस्कृती आहे. कार्यशाळेत सहभागींच्या वतीने डॉ. चंदन विश्वकर्मा, कृष्णा, उज्वला गुल्हाने, राजेश डोंगरे यांनी आपले मनोगत या प्रसंगी व्यक्त करत कार्यशाळेचे शैक्षणिक महत्त्व अधोरेखित केले. ही कार्यशाळा भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यास आधुनिक शिक्षणात प्रभावीपणे कसा समाविष्ट करता येईल यावर प्रकाश टाकणारी ठरली. विचारप्रवृत्त करणारे संवाद आणि आंतरक्रियात्मक सत्रांमुळे सहभागी शिक्षक व अभ्यासकांना एक वैचारिक दिशा प्राप्त झाली. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन अभिजित इंगळे यांनी केले. डॉ. माधव पुटवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या समारोप सत्रास विद्यापीठातील विविध विभागांतील अंशदायी शिक्षक, संशोधक विद्यार्थी व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काचीगुडा-जोधपूर रेल्वे नया-अमरावती मार्ग चालवा राजस्थानी ब्राह्मण समाजाची रेल्वेमंत्र्यांकडे मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

रेल्वे बोर्डातर्फे १९ जुलैपासून काचीगुडा (हैदराबाद) ते भगत की कोठी (जोधपूर) दरम्यान दररोज धावणाऱ्या रेल्वेगाडीचा प्रारंभ करण्यात आला आहे. ही रेल्वे सध्या अकोला आणि वाशिम मार्गे धावणार आहे. मात्र या गाडीचा नवा अमरावती आणि बडनेरा मार्गे आठवड्यातून तीन दिवस तरी प्रवास असावा, अशी मागणी राजस्थानी ब्राह्मण समाजातर्फे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे करण्यात आली आहे.

या मागणीमागे प्रमुख उद्देश असा आहे की, अमरावती परिसरातील रामदेव भक्तांना जोधपूरजवळील पवित्र रामदेवरा मंदिराच्या यात्रेसाठी ही सोय उपलब्ध व्हावी. राजस्थानी ब्राह्मण समाजाचे जिल्हा प्रमुख व समाजसेवक श्याम शर्मा (रक्तदान) यांनी रेल्वेमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात ही मागणी मांडली आहे.त्यांनी सूचवले आहे की ही गाडी आठवड्यातून तीन दिवस अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, नवा अमरावती, मोर्शी, वरुड, पांढुर्णा, बैतूल, आमला, इटारसी, भोपाळ आणि उज्जैन मार्गे धाववावी. यामुळे केवळ रामदेवभक्तांनाच नव्हे तर संपूर्ण राजस्थानी समाजाला आणि इतर प्रवाशांनाही याचा फायदा होईल. शिवाय रेल्वेला देखील अधिक महसूल प्राप्त होईल.अत्यंत उपयुक्त व लाभदायक ठरणारा हा मार्ग लवकरात लवकर मंजूर करून गाडी धाववावी, अशी जोरदार मागणी राजस्थानी समाजातर्फे करण्यात येत आहे.

# विमानाचे भाडे कमी करा आणि सकाळ-संध्याकाळची वेळ द्या, वानखडेंचे नागरी उड्डयण मंत्र्यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

अमरावतीहून मुंबईकडे झेपावणाऱ्या विमान फेरीची वेळ बदलण्यासोबतच भाडे कमी करा, अशी मागणी अमरावतीचे खासदार बळवंतराव वानखडे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी देशाचे नागरी उड्डयण मंत्री राम मोहन नायडू यांना निवेदन सादर केले आहे. सध्या अलायन्स एअरकडून आठवड्यातून दोन दिवस विमानसेवा उपलब्ध आहे. परंतु त्यासाठीची वेळ अयोग्य आहे. त्यामुळे सर्व घटकांना सोयीची होईल, अशी वेळ आणि सर्वांना झेपेल, एवढे भाडे आकारले जावे, असे खासदारांचे म्हणणे आहे.



खासदार वानखडे यांच्यामते, अमरावती हे विदर्भातील महत्त्वाचे शहर असून, येथील नागरिकांना औद्योगिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाजासाठी मुंबईस सतत प्रवास करावा लागतो. अशा नागरीकांची संख्याही मोठी आहे. अशा परिस्थितीत विमानसेवेच्या भाड्यांमध्ये झालेली अनावश्यक वाढ ही सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेर गेली आहे. त्यामुळे तातडीने भाडेवाढीचा फेरविचार करून ती पूर्ववत करावी. शिवाय, सद्यस्थितीत अमरावती-मुंबई विमान प्रवासाचा वेळ दुपारी ठेवल्यामुळे अनेक व्यावसायिक आणि कर्मचारी वर्गाला त्याचा फारसा उपयोग होत नाही. त्यामुळे ती बदलली जावी, अशीही त्यांची मागणी आहे.

नव्या वेळापत्रकात अमरावती येथून मुंबईकडे जाण्याची वेळ सकाळी आणि मुंबईवरून अमरावतीला परतण्याची वेळ संध्याकाळी ठेवण्यात यावी, जेणेकरून प्रत्येकाला एका दिवसात आपले काम आटोपून परत येता येईल. हा मुद्दादेखील मंत्र्यांना देण्यात आलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आला आहे.

### प्रवाशी हिताला प्राधान्याचे मंत्र्यांचे आश्वासन

बैठकीदरम्यान, नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी खासदार बळवंत वानखडे यांचे म्हणणे गांभीर्याने ऐकून घेतले असून, संबंधित अधिकाऱ्यांकडून तातडीने अहवाल मागवण्यात येईल आणि प्रवाशांच्या हिताला प्राधान्य दिले जाईल, असे आश्वासन दिले आहे.

# मोर्शी शहरात मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२मोर्शी**

मोर्शी शहरात आज झालेल्या मुसळधार पावसाने शहरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. सलग दीड ते दोन तास पडलेल्या पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचले असून, काही भागांत घरातही पाणी शिरल्याची माहिती आहे.

मोर्शी बस स्थानक परिसर, बाजारपेठ, गांधी चौक, आणि नाल्याजवळील परिसरांमध्ये पाणी साचून वाहतुकीस अडथळा निर्माण झाला आहे. नागरिकांना सकाळपासूनच घराबाहेर पडणे कठीण झाले असून शाळकरी विद्यार्थ्यांनाही मोठा त्रास सहन करावा लागला. महापालिकेच्या आपत्कालीन यंत्रणांनी काही ठिकाणी पाणी उपसण्याचे काम सुरू केले असले तरी अजूनही काही भागांत पुरस्थिती निर्माण झाली आहे. शहरातील नाल्यांची सफाई न झाल्याने अनेक ठिकाणी पाणी तुंबले आहे, असा नागरिकांचा आरोप आहे.

पावसामुळे वीजपुरवठाही काही भागांत खंडित झाला असून महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी दुरुस्तीचे काम सुरू केले आहे. हवामान विभागाने पुढील २४ तासांत अजून पावसाची शक्यता वर्तवली आहे.

# अकोला जिल्ह्यात ढगफुटीसदृश्य पाऊस

## गावात नदीचे स्वरूप, पुरात वाहून गेल्याने तरुणाचा मृत्यू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अकोला**

अनेक दिवसांपासुन दडी मारलेल्या पावसाने अनेक भागात जोरदार हजेरी लावली आहे. त्यानुसार अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातल्या पारस परिसरात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. यामुळे पारस गावाला नदीचे रूप आले आहे. तर लोकांचे शेती आणि संसारोपयोगी साहित्य पाण्यात वाहून गेले आहे. तसेच पुराच्या पाण्यात मोटारसायकलसह तरुण वाहून गेल्याने त्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना उबारखेड गावात घडली आहे.

अकोला जिल्ह्यातील पारस आणि आजूबाजूच्या पाच- सहा गावात रात्रीच्या सुमारास ढगफुटीसदृश्य पाऊस झाला होता. रात्री ३ वाजेपासून सकाळी सात वाजेपर्यंत सलग पाऊस सुरु होता. यामुळे गावात पूरस्थिती निर्माण झाली असून अनेकांच्या घरात पाणी शिरले आहे. परिणामी जनजीवन विस्कळीत झाले आहे. यात अनेकांचे संसारोपयोगी साहित्य पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने येथील ग्रामस्थांचे प्रचंड हाल होत आहेत. नागरिक घरातील पाणी बाहेर काढण्याचा प्रयत्न करत आहेत. तर बाळापुरचे तहसीलदार पूर परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

**पुरात बापलेक गेले वाहून**

तेल्हारा तालुक्यामध्ये पंचगव्हाण मंडळातील उबारखेड येथील मनोज नामदेव गवारगुरु व त्यांचा मुलगा वैभव मनोज गवारगुर हे दोघे रात्री ९ वाजेच्या सुमारास शेतातून मोटरसायकलने घरी जात होते. यावेळी पंचगव्हाण ते निंभोरा बु. मधात फरशीवरील नाल्याला पूर आल्याने त्यांनी पुरातून दुचाकी टाकली. यात दुचाकीसह वाहून गेल्याची घटना घडली असून यात वैभव गवारगुर याचा मृत्यु झाला. आज सकाळी मृतदेह मिळाला आहे.

**जिल्ह्यातील अनेक रस्ते बंद**

अकोला जिल्ह्यातील बाळापुर तालुक्यातील बाळापुर व पारस मंडळामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे तसेच मन प्रकल्पातुन आज सकाळी सोडण्यात आलेल्या पाण्याच्या विसर्गामुळे अकोट- देवरी- शेगाव या रस्त्यावरील वाहतूक ठप्प होती. तर लोहारा गावाजवळील मन नदीच्या पुलावरुन पाणी असल्याने हा रस्ता ९ वाजतापासून बंद करण्यात आला होता. रस्त्याचे दोन्हीकडुन उरळ पोलिस स्टेशनकडुन बैरीकेटींग करण्यात आले. पुलावरून प्रवाह कमी झाल्याने आता दुपारी १ वाजता वाहतूक सुरळीत झाली आहे.

# फुलांनी बाप्पांची आराधना, प्लास्टिक माळांना बायबाय !

## नैसर्गिक फुल उत्पादकांना दिलासा : गणपतीसाठी मागणी वाढणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

राज्य सरकारने फूल उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, लवकरच राज्यात प्लास्टिक व कृत्रिम फुलांवर बंदी घालण्यात येणार आहे. अलीकडच्या काळात विविध समारंभ, मंदिरे, मंगल कार्यालये, उत्सव आदी ठिकाणी प्लास्टिक फुलांचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढल्यामुळे नैसर्गिक फुलांची मागणी घटली होती. परिणामी, शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत होते.अमरावती जिल्ह्यात झेंडू, गुलाब, शेवंती, निशीगंध, मोगरा आदी फुलांची प्लास्टिक फुलांवरील बंदीमुळे स्थानिक बाजारपेठेला गती मिळण्याची आशा आहे. लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. इतर शहरांतून फुलांना मागणी वाढल्यास शेतकऱ्यांना अधिक दर मिळण्याची शक्यता आहे.

**प्लास्टिकमुळे फूल उत्पादक संकटात !**

प्लास्टिक फुलांच्या वापरामुळे शेतीमधून आलेल्या फुलांची विक्री कमी होत चालली होती. खासकरून गुलाब, झेंडू, शेवंती, मोगरा यांसारख्या पारंपरिक फुलांची बाजारपेठ कमी होत गेली. अनेक शेतकरी फूलशेती सोडून इतर पिकांकडे वळू लागले होते; पण प्लास्टिक फुलांवर बंदी आल्यास बाजारात नैसर्गिक फुलांची मागणी पुन्हा वाढेल, असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

**फुलांचे पारंपरिक महत्त्व...**

भारतीय संस्कृतीत फुलांना विशेष महत्त्व आहे. देवताच फूल अशाही परंपरा आहेत. पूजा, उत्सव, विवाहसोहळे अशा प्रत्येक शुभप्रसंगी नैसर्गिक फुलांचा वापर होतो. परंतु, प्लास्टिक फुलांनी ही परंपरा विसरली जात होती. बंदीमुळे नैसर्गिक फुलांना सन्मान मिळणार आहे.

**बंदीचा फायदा इतर व्यावसायिकांनाही....**

फूल सजावट करणारे डेकोरेटर्स, हार तयार करणारे, फुलांची वाहतूक करणारे व्यापारी अशा अनेक व्यावसायिकांना या बंदीचा फायदा होणार आहे. नैसर्गिक फुलांवर आधारित संपूर्ण साखळी पुन्हा सशक्त होणार आहे. यामुळे रोजगाराच्या संधी वाढतील. शिवाय प्लास्टिकमुळे पर्यावरणाचे होणारे नुकसान थांबणार आहे. अमरावती जिल्ह्यात अद्यापही बंदीबाबत आदेश आले नसल्याची माहिती मनपा प्रशासनाने दिली. परंतु, गणपतीच्या पार्श्वभूमीवर असा निर्देश सगळीकडेच लागू होण्याची शक्यता आहे.

# नागपूर विमानतळावर बॉम्ब आणि स्फोटके ठेवल्याच्या धमकीच्या इ-मेलने खळबळ

## विमानतळ प्रशासन अधिकाऱ्याला इ-मेल प्राप्त : अखेर ही अफवा ठरली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२नागपूर**

नागपुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर बॉम्ब आणि सिगारेट पॉकेटांमध्ये स्फोटके ठेवल्याचा इ-मेल मंगळवारी सकाळी ८ च्या सुमारास



विमानतळावरील वरिष्ठ अधिकाऱ्याला आल्याने एकच खळबळ उडाली. केंद्रीय सुरक्षा बल आणि नागपूर पोलिसांनी संयुक्त मोहीम राबवून विमानतळ आणि लगतच्या परिसराची तपासणी केली. तपासणी मोहीम दुपारी १२ पर्यंत सुमारे २ तास चालली. या तपासणीत काहीही आढळून आलेले नाही. अखेर मेल अफवा ठरल्याचे पुढे आले. विमानतळाची तपासणी सीआयएसएफचे वरिष्ठ अधिकारी आणि स्थानिक पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली डॉग स्कॉड आणि बॉम्बशोधक पथकाने केली.

ही तपासणी मोहीम नेहमीचीच असल्याचे अधिकाऱ्यांनी विमानतळावरील प्रवाशांना सांगितले. अशा प्रकारच्या धमकीचे इ-मेल देशातील अनेक विमानतळावर आल्याची माहिती आहे.

# पुरणपोळी शौकिनांचा होणार हिरमोड
# सणावारात डाळ महागणार

## किलोमागे पाच ते दहा रुपयांची दरवाढ
## सर्वसामान्यांना बसणार ऐन सणांतच फटका

**अरुण जोशी**



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

सनासुदीचा हंगाम जवळ आल्याने पुरणपोळी, वडे हनविण्याचा बेत परोघरी आखत असल्याचे दिसून वेत आहे. मात्र पुरणपोळी, वडे, फरसाण यांसारख्या पारंपरिक पदार्थासाठी महत्त्वाची असणारी हरभऱ्याची डाळ आता सर्वसामान्य ग्राहकांच्या आवाक्याबाहेर जाण्याच्या मार्गावर आहे. मागील आठवड्यात जिल्ह्यातील प्रमुख बाजार समित्यांमध्ये हरभऱ्याच्या दरात तब्बल पाचशे ते हजार रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. ही वाढ केवळ स्थानिक पुरवठा आणि मागणीपुरती मर्यादित नसून, बिहार, दिल्ली आणि पश्चिम बंगाल येथून आलेल्या मोठ्या प्रमाणातील मागणीचा परिणामही असल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

येत्या काही दिवसांत गणेशोत्सव, गोकुळाष्टमी, पोळा हे सण तोंडावर आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात हे सण मोठ्या प्रमाणात साजरे करण्यात येतात. त्यातच श्रावण मासातील उपवासांच्या पार्श्वभूमीवर या डाळीची मागणी अजून वाढत असते.

**आंतरराष्ट्रीय बाजारात हरभऱ्याचा भाव चमकला**

ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि तुर्कस्तानसारख्या देशांमध्ये उत्पादन घटल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात देशांतर्गत व्यापाऱ्यांनीही भाव हरभऱ्याचे दर वाढले आहेत. परिणामी वाढवण्यास सुरुवात केली आहे.

त्यातच आंतरराष्ट्रीय बाजारातील तेजी, साठवणुकीवरील नियंत्रण आणि आगामी सणांचा प्रभाव या सगळयांचा परिणाम हरभऱ्याच्या डाळीच्या किमतीवर होत असल्याने किमती वाढण्याचा अंदाज आहे.दिल्ली, बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये हरभऱ्याच्या डाळीचा वापर अधिक असतो. या राज्यांमधून महाराष्ट्रातील हरभऱ्याला मागणी वाढली असून व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात खरेदी सुरू केली आहे. त्यामुळेच दर वाढले आहेत. शेतकऱ्यांसाठी ही संधी ठरत असली तरी, सर्वसामान्य ग्राहक आणि पुरणपोळीप्रेमींना मात्र यंदाच्या सणात 'हिरमोड' सहन करावा लागणार, अशी शक्यता आहे.दरवाढीमुळे डाळीच्या दरात वाढ होणार असून, पुरणपोळीसारख्या पारंपरिक गोड पदार्थाचे उत्पादन महाग होणार आहे. गुढीपाडवा आणि गणेशोत्सवात पुरणपोळी आवर्जून केली जाते. मात्र दरवाढीमुळे आता पुरणपोळीवर ताव मारणे कठीण होणार आहे.

> सध्या साठा कमी आहे आणि मागणी वाढतेय. जर पावसाळ्यात उत्पादनावर परिणाम झाला, तर दर आणखी वाढू शकतात. तसेही जीवनावश्यक वस्तूच्या किमतीमध्ये चढ-उतार ही बाब नित्याची आहे.
>
> **किशोर शर्मा (व्यापारी) अमरावती.**

# विद्यार्थ्यांचे दोन गणवेशांचे स्वप्न भंगले; हाती मिळाला एकच!

## दुसरा गणवेश १५ऑगस्ट पर्यंत मिळण्याची विध्यार्थ्यांना अपेक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

राज्य शासनाने शाळेच्या पहिल्या दिवशीच प्रत्येक विद्यार्थ्याला दोन गणवेश आणि पाठ्यपुस्तकं मोफत देण्याचे आदेश दिले होते. मात्र जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना आजही केवळ एकच गणवेश मिळालेला आहे. शाळा सुरू होऊन महिना उलटला, तरी दुसऱ्या गणवेशाची प्रतीक्षा संपलेली नाही.



विद्यार्थ्यांना रोज एकच गणवेश परिधान करून शाळेत जावे लागत असल्याने त्यांच्यावर आणि त्यांच्या पालकांवर स्वच्छतेचा व सामाजिक दडपणाचा अतिरिक्त भार येत आहे. शिक्षण विभागाचे नियोजन आणि अंमलबजावणीतील दिरंगाईमुळे शासनाच्या 'दोन गणवेश' योजनेला हरताळ फासला जातोय, अशी प्रतिक्रिया शिक्षक व पालक वर्गातून उमटत आहे.दुसरा गणवेश १५ऑगस्ट पर्यंत मिळण्याची शिक्षक व विद्यार्थ्यांना अपेक्षा आहे.

**समग्र शिक्षण अभियान, पण अर्धवट अंमलबजावणी**

महापालिका, जिल्हा परिषद व नगरपरिषद शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व मुली, तसेच अनुसूचित जाती-जमाती व बीपीएल गटातील मुलांना दोन गणवेश देण्याची तरतूद आहे. यासाठी निधीही मंजूर करण्यात आला होता.

पण यंदा पहिल्याच गणवेशाचे वितरण संथगतीने झाले. दुसऱ्या गणवेशाबाबत विद्यार्थ्यांना केवळ आश्वासनच मिळत आहे.

**'एक राज्य, एक गणवेश' संकल्पनाही निष्फळ?**

मागील वर्षीपासून 'एक राज्य, एक गणवेश' संकल्पना लागू करण्यात आली. त्याअंतर्गत समान रंगाचा गणवेश सर्व विद्यार्थ्यांना देण्यात येतो. मात्र प्रत्यक्षात हा गणवेश सणानंतर उशिराच मिळतो. यंदाही दिवाळीनंतरच दुसरा गणवेश मिळेल, अशी शंका पालक व्यक्त करत आहेत.

**शाळा सुरू होऊन महिना उलटला**

जिल्हा परिषदेच्या शाळा २३ जूनपासून सुरू झाल्या आहेत. आजच्या दिवसापर्यंत विद्यार्थ्यांना फक्त एकच गणवेश मिळालेला आहे. शाळा सुरू होऊन महिना लोटूनही दुसऱ्या गणवेशाच्या प्रतीक्षेत विद्यार्थी आहेत.

**पंचायत समितीपर्यंत निधी पोहोचला, पण समन्वय गायब**

गणवेशासाठीचा निधी जिल्हा परिषद स्तरावरून पंचायत समित्यांना वितरित करण्यात आला आहे. मात्र गटशिक्षणाधिकारी कार्यालय व शाळांमध्ये समन्वय नसल्याने गणवेश वितरणात दिरंगाई झाली आहे.

# शेतजमीन वाटणीची नोंदणी शुल्कमाफीची अंमलबजावणी केव्हा
## शेतकऱ्यांचा सवाल : तीन महिने होऊनही आदेश निघेना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२२अमरावती**


शेतजमिनीच्या वाटणीनंतर नोंदणीदस्तासाठी आकारली जाणारी नोंदणी फी माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने २७ मे २०२५ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला; पण तीन महिने लोटूनही या संदर्भातील आदेश संबंधित विभागाच्या कार्यालयांना मिळालेले नाहीत. परिणामी, या योजनेचा लाभ मिळण्यापासून वंचित राहावे लागत असल्याने शेतजमीन वाटणीची नोंदणी शुल्कमाफीची




अंमलबजावणी केव्हा करणार? असा सवाल शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

सध्या नोंदणी फी ही शेती आणि बिगरशेती मिळकतीसाठी सारखीच आहे. ती एकूण मूल्याच्या १ टक्केपर्यंत (कमाल३० हजार रुपये) आकारली जाते. मात्र, शेती मिळकतीसाठी मुद्रांक शुल्क नाममात्र १०० रुपये असूनही नोंदणी फी माफ नव्हती. यामुळे अनेक शेतकरी दस्तांची नोंदणी टाळत होते व पुढे कायदेशीर वाद निर्माण होत होते. पण नव्या निर्णयाने शेतकऱ्यांवरील आर्थिक भार कमी होणार होता तसेच कुटुंबात निर्माण होणारे वाद टाळण्यास मदत होणार होती. कायदेशीर नोंदणी झाल्याने मालकीचे स्पष्ट दस्तवेजीकरण होईल. नोंदणी न केल्यामुळे भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास शेतकऱ्यांना व त्याच्या कुटुंबीयांना नाहक आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागतो; पण हे सर्व टाळणे शक्य होणार होते; पण अद्यापही नवीन निर्णयाचे आदेश संबंधित कार्यालयांना पोहोचले नसल्याने याचा शेतकऱ्यांना लाभ होत नाही. त्यामुळे शेतकरी संबंधित विभागात जाऊन परत येत आहेत. शासनाने २७ मे रोजी घेतलेल्या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करण्याची मागणी सागर सोनवाने व शेतकऱ्यांनी केली आहे.

# देवाधिदेव श्री महादेवाची चलनी नोटांनी आकर्षक सजावट



## पाच लाख ५१ हजार रुपयांचा वापर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अकोला**

श्रावण महिन्याला विशेष महत्व आहे. या महिन्यांमध्ये शिवालय भाविकांच्या गर्दीने फुलून जातात.सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले असते. हिंदी भाषिकांच्या श्रावण महिन्याची अगोदरच सुरुवात होते. हिंदी भाषिक द्वितीय श्रावण सोमवारनिमित्त वाशीम येथील प्रसिद्ध प्रभू पदमेश्वर संस्थान येथे प्रभू पदमेश्वराची चलनी नोटांनी अत्यंत आकर्षक सजावट करण्यात आली. त्यासाठी तब्बल पाच लाख ५१ हजार रुपयांच्या नोटांचा वापर करण्यात आला आहे.यामध्ये १०, २०, ५०, १००, २०० व ५०० रुपयांच्या कोऱ्या करकरीत चलनी नोटांचा वापर करण्यात आला

चलनी नोटांची ही नेत्रदिपक सजावट भाविकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. चलनी नोटांच्या सजावटीची चित्रफीत समाज माध्यमातून चांगलीच प्रसारित झाली आहे. श्रावण महिना हा अत्यंत पवित्र काळ आहे. जो प्रामुख्याने भगवान शिवाला समर्पित आहे.

या महिन्याला 'सणांचा राजा' असेही संबोधले जाते. कारण यात अनेक धार्मिक विधी, उपवास आणि सण साजरे केले जातात. भक्त या महिन्यात सोमवार आणि इतर दिवशी उपवास, पूजाअर्चा, मंत्रजप आणि ध्यान करून महादेवाची आराधना करतात. हिंदी भाषिकांच्या श्रावण महिन्याला गुरूपौर्णिमेपासूनच प्रारंभ झाला आहे. त्यामुळे शिवशंकराच्या मंदिरामध्ये भाविकांची चांगलीच गर्दी होताना दिसून येते. वाशीम शहरातील पदमेश्वर संस्थान प्रभू पदमेश्वराचे अत्यंत प्रसिद्ध शिवमंदिर आहे. या मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची नेहमीच मांदियाळी असते.

# हिवताप-डेंग्यू नियंत्रणासाठी शहरात गप्पी मासे सोडण्याची धडक मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२२अमरावती**

डेंग्यू व मलेरिया प्रतिबंधासाठी गप्पी मासे सोडण्याची एक विशेष धडक मोहीम जिल्हा स्तरावर राबविण्यात आली. सदर मोहिमेअंतर्गत मा. जिल्हाधिकारी यांचे निवासस्थान, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निवासस्थान तसेच पोलिस कॉर्टर परिसरातील डास उत्पत्तीच्या ठिकाणी गप्पी मासे सोडण्यात आले.ही मोहीम डासांच्या वाढीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली असून, यामध्ये जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या स्त्री वैद्यकीय



अधिकारी डॉ. पौर्णिमा उघडे मॅडम, जिल्हा हिवताप कार्यालयाचे आरोग्य निरीक्षक श्री. जयस्वाल सर, आरोग्य निरीक्षक श्री. हैदर अली सर, आय.सी. श्री. आशिष कापसे, श्री. प्रितम मारोडकर, तसेच एम.पी.डब्ल्यू. श्री. प्रतीक जोशी व श्री. विक्की भोक्कर यांचा सक्रिय सहभाग होता.गप्पी मासे डासांच्या लार्वावर उपजीविका करतात व त्यामुळे डासांच्या वाढीवर नैसर्गिक नियंत्रण मिळवता येते. त्यामुळे ही मोहीम हिवताप, डेंग्यूसारख्या आजारांच्या प्रतिबंधासाठी एक प्रभावी उपाय म्हणून राबविण्यात आली आहे.जिल्हा हिवताप कार्यालयामार्फत अशा प्रकारच्या मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असून, नागरिकांनीही त्यांच्या परिसरातील साचलेल्या पाण्याचे स्त्रोत साफ ठेवावेत, अशा प्रकारचे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात येत आहे.